महाराष्ट्र कविवर्य वामनपंडितकृत

# नामसुधा, वेणुसुधा
# व
# वनसुधा

म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. नं. 9283

अनुक्रम
विभाग काव्य
क्रमांक 9283
नों. दि.
वाचनालय

REFBK-0008738
REFBK-0008738

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २

महाराष्ट्र कविवर्य वामनपंडितकृत

# नामसुधा, वेणुसुधा

# व

# वनसुधा

अनुक्रम ७०.६२४
विभाग ··· मरा
क्रमांक ···· १२०३
नों. दि.

दा. क्र. ८७३८

REFBK-0008738
REFBK-0008738

कॉंटिनेंटल बुक सर्व्हिस, पुणें २

मुद्रक :
रा. ना. सरनाईक
सुलभ मुद्रणालय
२९१ शनवार, पुणें २

१२८३

• •

• •

• •

प्रकाशक :
गो. रा. पाटणकर
कॉन्टिनेंटल बुक सर्व्हिस,
६२६ शनवार, पुणें २

# नामसुधा.

## अध्याय पहिला.

### चरण पहिला.

( श्लोक )

हरिचरणसरोजीं चित्सुधासारपानें
    भ्रमर परमयोगी गुंजती नामगानें,
हरति सकळ दुःखां, हीं सुखाचीं निधानें
    वद वद वद जिव्हे ! वासुदेवाभिधानें.

हरिपण हरिनामें धातुमूर्तीसि आलें,
    हरिमय हरिनामें विश्व संतांसि झालें.
भवभय हरिनामें साधकांचें पळालें,
    वद वद वद जिव्हें ! रामनामें रसाळें.

हरितनु हरिनामें लेखिली सर्वभक्तीं,
    सहजसुखनिधानीं देखिली ही विरक्तीं.
शुकसनकमुखीं जीं गाइलीं जीतमुक्तीं.
    वद वद वद जिव्हे ! टाकुनी लौकिकोक्ती.

निगमहि हरिनामें गर्जती वर्णवर्णीं
    पतित तरति नामें आश्रमी आणि वर्णी,
हरिपदिं हरिनामीं जेंवि मुद्रा सुवर्णी,
    जगिं कवण असा जो नाममाहात्म्य वर्णी ?

आकाशअंत न कळोनिहि अंतरिक्षीं आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी,
नामप्रतापहि यथामति याच रीती, सीमा न पावति, तथापि मुनींद्र गाती.

अनुक्रम ........
विभाग ........
क्रमांक ........
नों. दि. ........
वाचनालय
दा. क्र. ८७३८

उडति मानसहंस जया नभीं शलभ त्याचि नभीं उडतां न भी.
अजितनाममहत्त्व ऋषि श्रुती वदति, तेंचि वदेन यथामती.

श्रुतिनिगमपुराणें आगमक्षीरसिंधु
मथुनि अमृतरूप ग्रंथ हा दीनबंधु,
प्रकट करिल आतां वामनात्मा मुरारी
श्रवणपठनमात्रें जो समस्तांसि तारी.

हा ग्रंथ याचिकरितां अमृताभिधानी नामें प्रसिद्ध 'हरिनामसुधा' म्हणोनी,
जें नाम गोड, महिमा अति गोड त्याचा, जो वर्णिती अमृतरूप परादि वाचा.
मोक्ष श्रुती वदति ज्यास गुणप्रसादें, तो पावती सगुण नामसुधानुवादें;
कोण्या मिसेंकरुनि यो हरिनाम वाचे नेत्र प्रकाशति तयावरि माधवाचे.
नारायणा म्हणुनि एक सुतासि बाहे, नारायणाख्य नर अन्य तयासि पाहे,
नारायणा म्हणति लौकिकही प्रवाहीं नारायणाक्षिविषय क्षण होति तेही.
आधींच साक्षि सकळांसिहि पाहताहे, जो नाम घे करुण होवुनि त्यास पाहे.
तो धन्य कीं क्षणहि ज्यावरि विष्णुदृष्टी, थेंबीं तळें भरतसे करुणांबुवृष्टी.
कर्मानुरूप फळदायक साक्षिदृष्टी सर्वांवरी तसिच तत्करुणांबुवृष्टी,
आहे परंतु जनपातक आड तेथें क्षेत्रें सुधेकरुनि त्या भिजवी न तेथें.

छायेसही सूर्य जसा प्रकाशी, जाणे तसा साक्षिहि पापराशी,
वृष्टीसही तोचि करी तथापि क्षेत्रांसि आच्छादिति लोक पापी.

नकळतहि पडे हा विष्णुनामाग्नि जेथें
दुरिततृणगृहाचें भस्म होणार तेथें,
मग सम करुणेची आयती कृष्णदृष्टी
भिजविल करितें जे सर्वसृष्ट्यर्थ वृष्टी.

जसें हेममूर्तीमधें हातपायीं दिसे एक सोनेंचि तें सर्व ठायीं,
असा विश्वरूपें स्वयें शेषशायी स्वनामें जना होतसे सौख्यदायी.
घटादीक नारायणाचींच नामें, तरी तीं अविद्यामयें दुःखधामें
म्हणोनी पुराणप्रसिद्धें विचित्रें जगत्पावनें विष्णुनामें पवित्रें.
महाभारतीं ये रिती धर्मराजाप्रति श्रीपतीदेखतां भीष्म आजा
वदे कीं ऋषी वर्णिती जे पुराणीं धरावीं तया विष्णुनामीं शिराणी.

श्लोकार्थ तो कीं तुज भूमिपाळा ! सांगेन ते मी हरिनाममाळा
जेथें प्रसिद्धें गुणकर्मरूपें नामें पवित्रें महिमाप्रतापें.
श्रुतिस्मृतींलागिं महापुराणीं व्यासादिकांच्या वदताति वाणी
नामें हरीचीं तुज तींच राया ! सांगेन सर्वांसहि उद्धराया.
महात्मयाचीं तुज नामधेयें सांगेन विख्यात मुनींद्रगेयें
म्हणोनि भीष्मोदित पद्य जेथें महात्म्यशब्दें गहनार्थ तेथें.
महात्मा हरी जो अशेषात्मभावें घटादीक तेव्हां तयाचींच नांवें,
तरी तारकें तीं जनाला न होती जगत्पावनें जीं ऋषी वेद गाती.
म्हणोनि विख्यात मुकुंदनांवें जीं वर्णिती वेद मुनींद्र भावें
सांगेन तीं मी तुज भूमिपाळा ! प्रसिद्ध जे माधवनाममाळा.
या कारणें जीं हरिनामधेयें, वेदीं पुराणीं मुनिवर्यगेयें,
ज्या ज्या मिसें उद्धरिती जनाला जाळूनियां पापमहावनाला.
भाषांतरीं कल्पित नाम जेथें श्रद्धानुरूपेंचि फळेल तेथें.
प्रताप नैसर्गिक त्यास नाहीं प्रसिद्ध नामीं फळ नेणतांही.
हें सर्व आपण चराचर, देववर्य श्रीकांत कारण सुवर्ण, समस्त कार्य
नामीं स्वयें प्रगटतो भलत्याचि ठायीं या भूषणीं कनक केवळ शेषशायी.
जगत् कार्य, तो कारण श्रीमुरारी स्वयें तोचि सर्वीं वसे निर्विकारी.
स्वरूपें स्फुरद्रूप सर्वत्र आहे मुखीं नाम ज्याचें तयालागिं पाहे.
अलंकार तो मागतां हेम आला,नव्हे हेम हें बोलवेना तयाला.
असीं रामकृष्णादि पुत्रादि नामें तरी सर्वही माधवाचींच धामें.
मागे अलंकार सुवर्ण त्याला दे कैंवि सोनार सराफ बोला
उच्चारिते लौकिक शब्द वाणी ज्याची तया दुर्लभ चक्रपाणी.
न सोनें अलंकाररूपास साहे मृषा त्या सुवर्णांत जो भासताहे,
असे हेम मिथ्या अलंकाररूपी सुवर्णीं अलंकार नाहीं तथापि.
अलंकारनामें नये हेम हाता, अलंकार येतो स्वयें हेम येतां;
समस्तांसही साधती विष्णुनामें, न विष्णूसही बाधती दुःखधामें.
या कारणें हरि म्हणाल जयासि जेथें, सर्वात्मते करुनि सिद्ध मुकुंद तेथें;
बोलावितां निजशिशूसिच त्याचि नांवें विख्यात अन्य नर ' ओ ' म्हणतो स्वभावें.

सुवर्ण म्हणतां जसें कनककुंडलीं तें दिसें;
मुकुंद म्हणतां तसा जनसुतादिकीं तो असे.
सुतादिसकळासही करुनि वर्ततो जो हरी
अशेष जनपातकें करुण तो स्वनामें हरी.

अजितनाम वदो भलत्या मिसें, करि कृतार्थ अमोघसुधारसें;
करुनि शाकहि भक्षिल औषधी, न करि ते गुण हें न घडे कधीं.
न कळतां पद अग्निवरी पडे, न करि दाह असें न कधीं घडे;
अजित नाम वदो भलत्या मिसें, सकळ पातक भस्म करी तसे.
श्रीविष्णुधर्मीं मुनि येचि रीतीं आख्यापिती कीं, ' जरि दुष्टचित्तीं
तो आठवीतां हरि पाप नाशी; नेणोनिही अग्नि तृणादिराशी. '
हरी आठवीला जरी दुष्टचित्तीं हरी पापमूळा कुमार्गप्रवृत्ती;
कळोनी जरी आठवीजे मुरारी हरी पातकें तो अशीं या प्रकारीं.
न ठावा हरी आणि ठावीं न नांवें, अशाच्या मुखा नाम आलें स्वभावें,
अनिच्छेकरूनी मुखा नाम आलें हरी मानितो कीं, ' मला आठवीलें. '
नसे द्वैत, सर्वांसही स्वात्मभावें हरी आठवे आठवाच्या स्वभावें,
तयाचेचि वाचेसही नाम जेव्हां नरें त्या हरी आठवीलाच तेव्हां.
जरी स्वात्मभाव स्फुरे सर्वभूतीं, स्फुरे तो अहंकाररूपींच चित्तीं
अहंशब्द जेथें स्फुरे नाम तेथें स्मृति श्रीहरीची असे सिद्ध जेथें.
असाही हरी आठवीतील पापी, हरी तो हरी सर्व पापें तथापी;
असा आठवीतां अनिच्छेकरूनी तरी तो करी शुद्ध पापें हरूनी.
म्हणोनीच कीं अग्निदृष्टांत येथें, न जाणोनिही घालितां भस्म तेथें;
न जाणोनिही नाम वाचेसि आलें स्वभावें तरी पाप त्याचें जळालें.
न जाणे शिशू अग्निची शक्ति कांहीं, जळो तूळ इच्छा अशी ज्यासि नाहीं,
तरी घालितां अग्नि कार्पासराशीं जळे, ये रिती नामही पाप नाशी.
शिशुकरें अनळें कडबा जळे, सहज अंगणिं दीसति तें वळे,
परि घरांतिल बीजहि आढळे न जळती कणगींतिल जोंधळे.
विषयभोगसुखात्मककामना सहज वेष्टुनि जे असते मना,
मन कुकर्म तिच्याच बळें करी सकळपातकमूळ अशापरी.

हुडकुनी असि कुत्सित कामना तिजवरी हरिनामहुताशना
जरि अमंगळ चित्तहि घालिती, सकळ पातकबीजचि जाळिती.
' न करुं पातक ' निश्चय हा घडे, मन तथापिहि पापपथीं पडे;
जरि धरी हरिनामक वित्त हें, अशुभही शुभ होइल चित्त हें.
जन न इच्छुनि शुद्धि असी जरी न कळतां हरि आठवितां तरी
जळति पापकुळें, अनळें जसीं न कळतांहि तृणें जळतीं, तसीं.

येथें म्हणाल, ' जळतीं जरी सर्व पापें, मूळें न कां जळति नाममहाप्रतापें ?
नेणोनि नाम म्हणतां दुरितासि जैसें जाळी न कां सकळ पातकमूळ तैसें ? '
धातूवरी अनळ नेणत बाळ घाली, तो अग्नि धातुमळ तो अतिशीघ्र जाळी;
ताम्रादि भस्महि तया अनळेंचि जेव्हां कर्ता अभिज्ञ बहु जाळिल धातु तेव्हां.

न जाणतहि ये मुखा ' हरि ' तथापि पापें हरी;
स्मरोनि महिमा स्मरे वदनिं तींचि नामें जरी,
प्रवृत्तिविषयीं जरी असति त्या जनांचीं मनें,
विरक्त करितो हरी स्वगुणनामसंकीर्तनें.

श्रीमद्भागवतीं अजामिळकथा व्यासें नृपातें शुकें
नामाचा अमित प्रताप वदतां हें वर्णिलें कौतुकें;
तेथें निर्णय विष्णुदूत वदती तो वामनाच्या मुखें
येथें ' नामसुधें 'त वर्णिल हरी श्रोत्यांस जेथें सुखें.

अध्याय तीन इतिहास महापुराणीं, टीका तदर्थ रचिली क्षितिलोकवाणी
अध्याय एथ तितुकेच करी मुरारी, तीहींसही चरण सुंदर चार चारी.
अध्याय तो प्रथम 'नामसुधें'त तेथें, त्याहीसधें चरण हा पहिलाचि एथें,
संपूर्ण अर्पुनि मुकुंदपदारविंदीं सर्वात्मतेकरुनि वामन त्यास वंदी.

## चरण दुसरा.

### ( श्लोक )

षष्ठस्कंधमुखीं अजामिळकथा, संक्षेप टीका तिची
श्रीगोविंद करील वामनमुखें छायात्मविश्रांतिची;

श्रोत्यांच्या श्रवणोदरांत अलसें त्रासें समासें करी
व्याख्या 'नामसुधा' हरी करितसे, जे पापतापा हरी.
परिसुनि शुकवाक्यें सर्व भूगोळ भूपें
नरककथनकाळीं तेथ ऐकोनि पापें
जननरकनिपातें फार संतप्त झाला;
जगदघहर रायें श्रीशुका प्रश्न केला.
शुकाच्या मुखें पंचमस्कंध कानीं परीक्षिन्नृपें आदरें आयकोनी
चुके यातना केंवि हा प्रश्न केला, पुढें षष्ठ हा तेथुनि ग्रंथ झाला.
जें पंचमीं हरिकथामृत दिव्य प्याला, उद्धाररूप अवघा अनुवाद केला;
यानंतरें पुसतसे परिहार पापा, जो चूकवी नरकनामक अग्नितापा.
नृप म्हणे, 'कथिल्या तुम्हि दुर्गती, परि वदा चुकती कवणे रिती ?
पुरुष आचरल्या कवणे स्थिती गमन तो न करी नरकाप्रती ?'
'प्रायश्चित अघानुरुप करितां हीं नासतीं पातकें,
ऐशा दुर्गतिनिर्गती कथियल्या रायासि आधीं शुकें,
प्रायश्चित्त समस्त कर्ममय हें रायासि वाटे वृथा,
बोले, 'कीं गजशौच हें सकळही याची वृथा कां कथा ?
हस्तीतें धुतलें, जळीं बसविलें, मालिन्यही नाशिलें,
तेणें तें पहिलें स्वकर्म वहिलें तीरींच आरंभिलें,
शुंडाग्रें धरिलें धुळीस, भरिलें सर्वांगही आपुलें,
प्रायश्चित्त दिलें तथापि न भलें ज्याचें मन क्षोभलें,
प्रायश्चित्त जना कृपामृतघना ! तें सांग कीं या मना
पापाच्या दहनावरील पवना वारी हरी कामना,
जो पापी घटना प्रवृत्तिरचना दुर्वार ते यातना
प्रायश्चित्त पुन्हां स्मरोनि वचना बोलें जगत्पावना !'
करी असा प्रश्न नरेंद्र जेव्हां रहस्य सांगे मुनिवर्य तेव्हां.
म्हणे, 'खरें होतिल शुद्ध पापी, न पापबीजें जळती तथापी.
अज्ञा जनाला अधिकार जेथें, न पापबीजें जळतील तेथें;
या कर्मशुद्धी गजशौचरुपा, हेंही खरें तूं वदलासि भूपा !

मोठें प्रायश्चित्त तें आत्मविद्या, नाशी जे कां पापमूला अविद्या;
विद्या नाशी पातकें आणि पुण्यें नानाजन्मीं संचितें जीं अगण्यें.
हें तों खरें, परि न जोंवरि चित्तशुद्धी तों प्राणियांसि न घडे निजबोधसिद्धी.
ते शुद्धि तों भगवदर्पणकर्मयोगें, पापें स्वयें जळति सर्वहि त्या प्रसंगें.

कर्में दासपणें करूनि निपुणें नारायणीं अर्पणें,
पापातें क्षपणें, रमापतिगुणें प्रेमामृता सेवणें,
सत्संगीं वसणें, स्मृतींत असणें, एकांतिचें बैसणें,
सर्वां हें करणें, भवाब्धि तरणें, दुर्वासना मारणें.

ऐसी केवळ भक्ति मात्र करितां कैवल्यही पावती
भक्तीवांचुनि अन्यथा न चुकती तेव्हां तरी दुर्गती;
मद्याच्या कलशासि शुद्ध करितां व्यर्थेंचि तीर्थें जसीं,
श्रीगोविंदपदारविंदविमुखां कर्में समस्तें तसीं.

करी प्रायश्चित्तें, तनु विविध तीर्थांत बुडवी,
व्रतें नाना कर्में करुनि, हरिभक्तीस उडवी,
पवित्रें तीं देऊं न शकति, तया पावन कळा
सुराभृद्भांडातें त्रिभुवननद्या जेंवि सकळा.

कृष्णार्पणें करिति जे निज सर्व कर्में, सिद्धी अनेक घडती हरिदास्यधर्में,
पापें समस्त जळती, उठती विरक्ती, वाढे जसी जसि मुकुंदपदाब्जभक्ती.

हरिभजनिं असें तो शीघ्र कैवल्य लाधे,
नरक चुकति हें तों थोडियामाजि साधे.
म्हणउनि शुक बोले श्लोक ते व्यासवाणी
सुजन धरुत चित्तीं हेचि गीर्वाणवाणी.

आयासाविण ही कथा परिसतां गोडी हरीच्या गुणीं
ज्या चित्ता उपजे, निघे सहज तें त्याच्या पदीं तत्क्षणीं;
ऐसें अर्पिति कर्म जें सहजही जे एकदां त्या मना
ते स्वप्नीं नयनीं न देखति यमा, कैंच्या तयां यातना ?

इतुकिही हरिभक्ति कसी जना ? म्हणसि साध्य जडा मलिना मना;
तरि नृपा ! हरिनामसुधागुणें सकळ साधनमात्र गमे उणें.

न कळतां हरिनामसुधा मुखीं जरि पडे, जन होय तरी सुखी.
जरि महत्त्व कळोनिहि वैखरी हरि म्हणे, मग काय तया उरी ?
सुतमिषें हरिनाम अजामिळें वदनिं आणुनि उद्धरिलीं कुळें. '
शुक म्हणे, ' इतिहासहि तो नृपा ! तुज वदेन, करूनि महाकृपा. '

## चरण तिसरा.

(श्लोक)

शुक म्हणे मुनि, ' आयिक राजया ! द्विज अजामिळनाम कनोजया
निज कनोजपुरीं वृषलीपती परम पातकि पातकसंगती.
दासीचा पति नष्ट दुष्ट अवघें ब्राह्मण्यही टाकिलें,
अठ्यांशीं वरुषें वया सकळही त्यानें तिसीं घातलें;
तीच्या पोषणपालनार्थ सकळें तो आचरे पातकें,
तीच्या गर्भदरींत जो उपजतां मानी मनीं कौतुकें.
श्रुति वदति जयाचा गर्भ पोटांत जीच्या
पुरुषाचि सुतरूपें गर्भवासांत तीच्या;
कळत कळत जों जों पुत्र दासीस होती,
द्विज सुख बहु तों तों मूढ मानी स्वचित्तीं.
जरठ तो वृषळीउदरीं दहा सुतमिषें उपजोनि सुखी महा;
सुत तिचे अति सादर खेळवी, विविध लाड रसें करि, आळवी.
नारायणाख्य सुत त्यांत कनिष्ट झाला, तो आवडे अवघियांहुनि फार त्याला.
वृद्धासि याउपरि होइल बाळ कैचें, भावें अशा करित लालन फार त्याचें.
जरठ खेळवुनी निज बाळ तो सफळ मानि अजामिळ काळ तो.
परिसता वचनें मृदु बोबडी सुखमृगांबुमधें मन दे बुडी ॥
असा खेळवी पातकाच्या फळातें, करी धन्य तन्नामधेयें कुळातें;
तयाच्या मिसें नाम नारायणाचें हरी सर्वही पाप त्या ब्राह्मणाचें.
ये ये नारायणा ! रे ! वद वद वचनें गोड नारायणा ! रे !
जेवीं नारायणा ! रे ! क्षुधित बहुत तूं आजि नारायणा ! रे !

कोठें नारायणा ! रे ! त्यजुनि मज नको जावुं नारायणा ! रे !
मातें नारायणा ! रे ! तुजविण न गमे वेळ नारायणा ! रे !
उष्णांत नारायण खेळताहे, गृहींच नारायण तो न राहे.
नारायणा शीतळ पाज पाणी ’ नारायणीं रंगलि विप्रवाणी.
‘ नारायणा जें प्रिय खाद्य व्हावें, नारायणां तें अति शीघ्र द्यावे.
नारायणा मी करूं काय वाणीं ? ’ नारायणीं रंगलि विप्रवाणी.
‘ नारायणावांचुनि मी न जेवीं, नारायणावीण न नीर सेवीं.
नारायणा धुंडुनि शीघ्र आणीं ’ नारायणीं रंगलि विप्रवाणी.
‘ नारायणास झणिं होइल दुष्टदृष्टीं नारायणास झणिं कीटकदंशदृष्टी,
नारायणास झणिं रागिजतील कोणीं ’ नारायणस्मरणिं रंगलि विप्रवाणी.
‘ नारायणासम शिशु त्रिजगतांत नाहीं, नारायणीं न अणुमात्रहि दोष कांहीं.
नारायण प्रियतमे ! गुणरत्नखाणीं ’ नारायणस्मरणि रंगलि विप्रवाणी.
असा सर्वदा छंद नारायणाचा; प्रियेसीं सदा वाद त्याच्या गुणांचा.
मनीं स्वप्निंही लागला छंद ऐसा, जसा जागरीं वर्तवी स्वप्निं तैसा.
पापद्रुमीं नवल पुण्य फळासि आलें, नारायणा म्हणुनि तें सुतनाम झालें.
नारायणा म्हणुनि यद्यपि पुत्र पाहे, नामप्रताप उगला न तथापि राहे.
लक्ष्मीकांतकृपासुधाघन जगीं सर्वांवरीं वर्षतो,
जे कां पातकझोंपडींत दडती त्यांतोंचि न स्पर्शतो.
विप्राची अघझोंपडी न कळतां नामाग्निनें जाळिली,
तेव्हां कृष्णकृपांबुवृष्टि सहसा माथां पडों लागली.
नामाग्निनें अघकुळें जळतां अशेषें, संतोषला हरि तयावरि नामघोषें.
‘ द्यावा तयासि निज केवळ भक्तिधंदा ’ ऐसी अहो उपजली करुणा मुकुंदा.
टाकूनि तो वृषलिसंगति, भक्तियोगीं लागोनि, अक्षयनिजात्मसुखासि भोगी.
ऐसी कृपा उपजली करुणालयाला निर्माण ये विषयिं एक उपाय केला.
यमासही मोहन वासुदेवें केलें असें कीं, यमधर्मदेवें
असोनि आयुष्यहि त्या द्विजाला निष्पापही तो द्विज आणवीला.
आयुष्य शेष म्हणऊनिच त्या द्विजासी नेलें न विष्णुसदनाप्रति विष्णुदासीं.
आयुष्य शेष असतां यमधर्मराया तो मृत्युकाळ गमला, तरि विष्णुमाया.

अंतीं कथा शुकहि वर्णिल याच रीती, कीं वांचला तदुपरांतिक तो द्विजाती.
आयुष्यही सरलिया जरि विप्र वांचे प्रारब्धनेम लटिके मग या जिवांचे.

आतां म्हणाल, सुतनाममिषेंच पापें गेलीं जळोनी हरिनाममहाप्रतापें,
त्याला न भक्ति घडली म्हणऊनि देवें भक्तीनिमित्त दिधलें वय वासुदेवें.

जे जे जीवन्मुक्त ते भक्त मोठे, प्रारब्धाचे भोगिती भोग खोटे,
ते प्रारब्धें सर्वथा जो न मोडी येथें कैसा आपुला नेम सोडी ?

दिल्हें त्यासि आयुष्य हें कां म्हणावें ? यमा मोहिलें हींचि अंगीकरावें;
पुढें शेष आयुष्य तें भक्तिभावें सरावें तदंतीं स्वलोकासि न्यावें.'

असा माधवें सत्य संकल्प केला, मनीं घातला मोह तेव्हां यमाला.
द्विजाचें किती एक आयुष्य आहे कसा आणवूं ? मोहला हें न पाहे.

सुतमिषें हरिनाम मुखीं सदा जळति त्याकरितां अघआपदा,
परि अगोचर हा महिमा यमा, म्हणुनि आणवि विप्रकुळाधमा.

द्विजाचे दुरन्याय ते आठवीले, तिघे दूत आणावया पाठवीले,
उभे मस्तकीं तांबडे केश भारी, मुखें वांकुडीं अंग नानाविकारी.
काळीं मुखें मारिति चंड हाका, 'बांधा धरा हा नरकांत टाका.'
धरूनि फांसे विकराळ हातीं दंष्ट्रा कराळा वदनीं न माती.

बहु त्रासला विप्र देखोनि त्यांला, म्हणे, 'त्रास होईल नारायणाला;
मुलामाजि तो गुंतला दूरि खेळीं.' द्विजें त्यासि पाचारिलें अंतकाळीं.
अकस्मात 'नारायणा ! ये' म्हणोनी म्हणे विप्र उच्चस्वरें आळऊनी.
यमाचा पडे लिंगदेहास फांसा, उठे विप्रवाणीमधें घोष ऐसा.

निघे स्थूळदेहांतुनी लिंग जेव्हां सुताच्या मिसें नामवाचेसि तेव्हां,
उडी त्यामधें घातली विष्णूदूतीं गदा शंख पंकेरुहें चक्र हातीं.

ते तोडिले पाश तिहीं यमाचे जे किंकर श्रीपुरुषोत्तमाचे,
दटाविले ते यमदूत दापें त्या ब्राह्मणा सोडविलें प्रतापें.

टकमकां यमदूत तयांकडे चकित होवुनि पाहति बापुडे,
धरुनि धैर्य तथापिहि त्यांप्रती समयिं त्या यमकिंकर बोलती.

विभाग ..............
क्रमांक ........
नों. दि. .......

## चरण चवथा

### ( श्लोक )

तीघे तयांसि म्हणती, ' यमशासनाला उल्लंघणार तुम्हि कोठिल कोण? बोला.
सांगा तुम्हीं अमर, कीं उपदेव, किंवा गंधर्व, सिद्ध, करणार सुरेंद्रसेवा ?

कोठें हो असतां? अपूर्व दिसतां, हेमांबरें नेसतां,
अम्लाना कमळांचिया अळिकुळीं माळा गळां घालितां,
चौघांही भुज चारि, पीन सरळे श्रीचंदनें चर्चिले
चौघे रत्नहिरण्यभूषणवरीं सर्वत्रही अर्चिले.
शस्त्रास्त्रें धरितां समान, तरुणे चौघे तुम्ही, सांवळे,
डोळे भाळ विशाळ पुष्ट बरवे, रूपें बळें आगळे
तेजें आपुलिया दिगंततमही दूरूनि संहारितां,
दूतांला यमधर्मराजविभुच्या आम्हांसि कां वारितां ? '

शुक म्हणे, 'यमकिंकर ये रिती वदति विष्णुनिदेशकरांप्रति
परिसतां हरिपार्श्वग हांसिले, घनरवें मग गर्जत बोलिले.
'धर्मदूत तरि हे म्हणवीती, पापहीन नरकाप्रति नेती.'
भाव हा धरुनि आंत विनोदें पूसती हरिसभासद मोदें.
'धर्मराजविभुचे तुम्हि जेव्हां, धर्म जाणत असां तुम्हि तेव्हां,
पूसतों म्हणुनि एक तुम्हांला धर्मतत्त्व, तुम्हि सत्वर बोला.

कर्ते सर्वहि दंडयोग्य अथवा जीवांमध्यें नेमिले
कीं तें पाप असो नसो परि तुम्ही दंडार्ह ते लेखिले.'
ऐसे तत्परिहास दास हरिचे हांसोनियां बोलिले,
कीं 'निष्पातक जो तयासि नरका हे न्यावया पातले.'

विनोदें असे दूत सर्वोत्तमाचे पुसों लागले, दूत त्यांतें यमाचे
प्रवृत्तिप्रवाहें यथाशास्त्ररीतीं बरीं उत्तरें मृत्युचे भृत्य देती.
तीं वर्णिलीं मुनिवरें निवडोनि जेथें संक्षेप त्यामधुनही वदिजेल येथें.
वैकुंठनाममहिमा श्रवणानिमित्तें उत्कंठिनें तदमृतार्थ तृषार्तचित्तें.
म्हणति 'विहित वेदीं 'धर्म' त्याला म्हणावें,

स्मृतिनिगमनिषिद्धें ते 'अधर्म' स्वभावे.
शुभ अशुभहि कर्में जीं करी जीव जेथें
तनु हृदयि पहाती देव सूर्यादि तेथें.

देवांत साक्षि यमधर्महि त्यांत आहे, पाप्यास तो तदनुरूपाचि दंड पाहे.
जीवांसि पातकफळें सकळांसि देतो, धाडूनि दूत निरयाप्रति त्यांस नेतो.
प्रस्तूत हा द्विज अजामिळ शुद्ध पूर्वी, संपन्न सर्व सुगुणी अतिमान्य सर्वी,
आणावयास समिधा कुश पुष्प पानें रानासि विप्रवर पाठविला पित्यानें.

परततां समिधा कुश घेवुनी, तरुण सुंदर देखिलि कामिनी,
पुरुष एक तिसीं रत देखिला, पिवुनि मद्य मदें बहु मातला.

उपवनि नरनारीद्वंद्व उन्मत्त भारी
कुसुमशरविहारी, युग्म दिग्वस्त्रधारी
स्मर हृदय विदारी, देखतां या प्रकारी,
द्विज जरि बहु वारी, नावरे चित्त हारी.

मनसिज द्विजमानस या मिसें खवळुनी करि तीकरितां पिसें
बहुहि आवरितां मन नावरे, हृदयिं तो मकरध्वज वावरे.
मग तिच्या सदनाप्रति जावुनी, धन तिला तदपेक्षित देवुनी,
रतिरसें वरि लंपट होवुनी, विचळला अधरासव सेवुनी.
पित्यानें बहू अर्जिलें वित्त होतें, दिलें द्रव्य तें या द्विजें सर्व तीतें;
महा मोहला नीचकांतांगसंगें, स्वधर्मासही टाकिलें त्या प्रसंगें.

तिच्या स्नेहपाशें जसा बद्ध झाला, न ते आवडे धर्मपत्नी द्विजाला.
तिला टाकिलें, टाकिलीं मायबापें; तिसीं आचरूं लागला सर्व पापें.
तिच्या पोषणातोषणाच्या निमित्तें बहू मेळवूं लागला पापवित्तें.
तिला ध्यातसे सर्वदा दुष्ट चित्तें, असा कंठिला काळ येणें प्रमत्तें.

या कारणें द्विजकुळाधम शीघ्र तेथें नेवूं, असे धरुनि दंड कृतांत जेथें.
भोगील दुष्कृतफळा नरकासि जेव्हां, हे पापभोग अवघे सरतील तेव्हां.'

शुक म्हणे, यमकिंकर ये रिती वदति धर्म अनेक तयांप्रती;
श्रवणिं ऐकुनि या वचनास ते 'हरि हरी' म्हणती हरिदास ते.'

तो तों अजामिळ तिहीं द्विज सोडवीला, त्याच्या हितार्थ उपदेश तयासि केला.

नामप्रताप कथिला मग त्या प्रसंगें, नामें अमोघ हरिच्या जनपाप भंगे.
तें उत्तरप्रकरणीं जगदात्मबंधू बोलेल वामनमुखें करुणैकसिंधू.
स्कंधांत या प्रथम ह्याचि महापुराणीं अध्याय दिव्य, वदली मुनिवर्यवाणी.
अध्याय जैसा पहिलाच तेथें, तैसाच हा ' नामसुधें 'त तेथें.
भावार्थ गूढार्थ यथार्थरूपें निरूपिला श्रीहरिच्या प्रतापें.

द्वितीयापासूनी धरुनि सकळा व्यासवचना
हरी टीकाकर्ता तदुपरि महाराष्ट्र रचना.
तथापि श्लोकींचें प्रतिपद न भाषेंत मिरवे,
जसे देहीं डोळे दिसतिल तसे श्लोक बरवे.

---

# अध्याय दुसरा.

## चरण पहिला.

(श्लोक)

अध्यायीं दुसऱ्या प्रतापमहिमा नामामृताचा स्वयें
श्रीवैकुंठपदाब्जभृंग कथिती नानापरी निश्चयें.
गेला ज्या श्रवणें अजामिळहि तो जेथें स्वयें श्रीपती,
आतां काय पहा मुनींद्र वदतो येथूनि रायाप्रती.

शुक म्हणे, ' इतुकी हरिकिंकरी परिसतां यमकिंकरवैखरी,
सकळनीतिविशारद त्यांप्रती वदति, आयिक तें धरणीपती !
' अन्याय आचरण तें यमकिंकरांचें, ' हें बोलणें परमधर्मधुरंधरांचें,
ऐकोनि मानुनि मनीं हरिदास भारी हे श्लोक पांच वदती प्रभु ! या प्रकारीं.
न पापी न दंडार्ह ऐशास जेथें, करीती वृथा ये रिती दंड तेथें;
अधर्म स्वयें स्पर्शतां धर्मवंतां, अहो ! कष्ट ते वाटती थोर संतां
जे मायबाप जनशासनदंडधर्ते, जे साधु सर्वसम जे नयनीतिकर्ते,
ऐशांसही विषमता उपजेल जेव्हां, कोणास हे शरण जातिल लोक तेव्हां

अन्याय आचरति संत समर्थ जेथें, तैसेचि सर्व जनही करितील तेथें;
तेव्हां बुडेल जग भाव धरूनि, ऐसा हा श्लोक यावरि पहा वदतील कैसा?

जसा वर्ततो एक कल्याणकारी, जगीं वर्तती सर्वही त्या प्रकारीं;
वदे तो सदाचार शास्त्रार्थ जैसे, जगीं वर्तती सर्वही लोक तैसे.

श्लोकत्रयीकरुनि शासनदंडधर्ते होऊनि हे नव्हति केवळ नीतिकर्ते,
ऐसें वदोनिहि अतःपर बोलती कीं विश्वासघातकहि केवळ हे त्रिलोकीं.

माझा मित्र सखा म्हणोनि हृदयीं विश्वासला जो असा,
अंकीं ठेवुनि मस्तकासहि निजे त्याला वधी तो असा;
निष्पापा यमधर्मराज नरकीं घालूं म्हणे जेधवां,
विश्वासूनि अशास शुद्ध जन हे होती कसे तेधवां?

निष्पाप केवळ अजामिळ नामघोषें, गेलीं जळोनि कृतपापफळें अशेषें.
याला कसें म्हणति पातक याचि भावें नामप्रसंग वदतील महाप्रभावें.
येथूनि नाममहिमा वदती हरीचा, ऐका विलास हरिकिंकरवैखरीचा:
प्रत्यक्षशब्दउपमाअनुमानरीती श्रोत्यांसि जे रिति घडे महिमाप्रतीती.

हा तों भूतभविष्यपातककुळा जाळूनियां राहिला,
कीं नारायणनाम जो विवशही होवूनियां बोलिला;
कल्याणालय नामधेय हरिचें आलें मुखा जेधवां
याचे जे भवपाश ते हरियले श्रीमाधवें तेधवां.

म्हणाल 'पापघ्न म्हणूनि त्याचे आलें न नारायणनाम वाचे;'
'झाला कसा नाश समस्तपापा?' म्हणाल ऐका तरि त्या प्रतापा.

जेव्हां नारायणा ये म्हणउनि वदला अक्षरें चारि वाचे,
प्रायश्चित्तें अशेषें सहजचि घडलीं, नाशले दोष त्याचे;
तावन्मात्रेंचि याचीं सकळहि दुरितें पातकेंही जळालीं,
जेव्हां नारायणाची स्ववदनसदनीं अक्षरें चारि आलीं.

नाशावाया पापकुळासि कांहीं नामा असा अन्य उपाय नाहीं;
म्हणोनि पद्यद्वय धर्मदूतां वाखाणिती तें हरिदास आतां.
मित्रद्रोही मद्यपी वित्तहारी स्त्री गो विप्र क्ष्मापती यांसि मारी,
ऐसे नाना आणाखी पापकारी यांला शुद्धी देवुनी नाम तारी.

या दों श्लोकीं पापिया शुद्धिधामें प्रायश्चित्तें बोलिलीं विष्णुनामें,
येथें अंतीं दूसऱ्याच्या चतुर्थी पादीं पाहा बोलिलीं जीं समर्थी.
श्लोकाचिया त्रिचरणीं सकळांसि शुद्धी अत्यंत जेथ न पुन्हां अणु पापबुद्धी,
तें हेंच कीं अजितनाम म्हणाल कैसें ? त्याचें निमित्तहि चतुर्थपदांत ऐसें.
विषय बुद्धिस होय रमापती म्हणति यास्तव ' तद्विषया मती, '
विषय बुद्धिस ज्याकरितां हरी परम उत्तम नाम अशापरी.

सकळहि अघबीजें नाशती अंतरींचीं,
अतिअघहर नामें यास्तव श्रीहरीचीं.
हरिविषय मतीचा कीर्तनें होय जेव्हां,
करतळगत त्याला चारिही मोक्ष तेव्हां.

वदनिं तद्गुणकीर्तन जेधवां, मन तदर्थक तन्मय तेधवां;
म्हणुनि कीर्तनिं तद्विषया मती, विषय विष्णु मतीस असे रिती.

विषयहि हरि होते बुद्धि तन्नाम जेथें
म्हणउनि दुसराही होतसे अर्थ येथें;
परि उचित दुजा या प्रस्तुतीं अर्थ झाला
नकळत हरिनामें पापमेळा जळाला.

नारायणस्मरण बुद्धिस पुत्रभावें झालें, तथापि हरि दृष्टि पडे स्वभावें;
एकास एक जन घेवुनि नाम बाहे, तन्नामधारक दुजाहि तयास पाहे.
न पाचारितां आपणा जो स्वभावें स्वयें ' ओ ' म्हणे आणि पाहे स्वभावः
न सर्वज्ञ तो विष्णु सर्वज्ञ कैसा पहाता न जाणोनि संदेह ऐसा ?
सर्वत्र हें कथियलें हरि सर्वसाक्षी जेथें स्वनामकरुणेस्तव त्यास लक्षी,
नामप्रताप हरि नाम कळोनि ऐसा, पाहे कृपेकरुनि त्यास हरी न कैसा ?
' पाचारितो निजसुतासि मदीय नांवें म्यां कां कृपेकरुनि त्यास अहो ! पहावें ? '
सर्वज्ञही परि जना न असा उपेक्षी, नेणोनि नाम म्हणतांहि कृपाळु लक्षी.
जो कां दयाळु सुख सर्वजना अपेक्षी नामप्रताप समजोनि कसा उपेक्षी ?
नामें अघें जळति हें तरि सर्वसाक्षी जाणें अशा रिति अजामिळबुद्धि लक्षी.
जीवोद्धारनिमित्त जो अवतरे मत्स्यादि रूपें धरी,
तीर्थें वेद पुराण शास्त्र अवघें ज्याकारणें जो करी,

साक्षी आणि समर्थ आणि करुणासिंधु स्वयें जो हरी,
तन्नामें भलत्या मिसें वदति जे त्यांला कसा नुद्धरी ?

हा पूर्वपक्ष हरिला हरिनेंच येथें, आतां पुढें वदति पार्षद काय तेथें ?
आणीकही म्हणति पापहरें विचित्रें होती तरी न जसिं केवळ नाममात्रें.

प्रायश्चितें बहुत वदती वेदवक्ते, तथापी
त्या त्या कर्मे करुनिहि जरी शुद्ध होतील पापी,
रामा कृष्णा मुरहर हरे या पदीं शुद्धि जैसी
प्रायाश्चित्तें इतर न कधीं शुद्धि देतील तैसी.

श्लोकीं असें कथुनि तीं चरणेंकरूनी तें बोलती जरि किमर्थ असें म्हणूनी
श्रीविष्णुदूत हरिनामगुणानुवादें येथें निमित्त वदतील चतुर्थ पादें.

हरति सकळ पापें उत्तमश्लोकनामें तदुपरि रचितांतें रूचती विष्णुधामें.
हरिगुण हरिनामीं पाहतां अर्थ त्याचा, मग विषयविषाचा अंतरीं ताप कैंचा?

कडुवट बहु वाटे शर्करा पित्तरोग्या,
परि परम सिता तें पित्तनाशासि योग्या;
सहज मधुर तेही पित्त नासूनि देहीं
निज अति रुचि दावी, आवडों दे न कांहीं.
कडुवट हरिनामें वाटती पापियाला,
परि दवडुनि पापें, गोड होती तयाला;
मग विषयसुखाची नाठवे त्यास वार्ता,
म्हणउनि न पुन्हा तो होय अन्यायकर्ता.
हरुनि सकळ पापें गोड होतील नामें,
मग मनिं अभिरामें सूचती विष्णुधामें;
हरि सकळहि पापें तत्फळें दुःखवृंदे
'हरि हरि' म्हणवीलें यास्तव श्रीमुकुंदें.
न कळत हरिनामें नासती पापमात्रें,
परि करिति कृतार्थ श्रीपतिप्रीतिनेत्रें;
तदनु हरिकटाक्षें नाम जाणोनि घेती,
गुणि मिठि पडतां ते पातकी केंवि होती ?

मधुर मधुर नामें दाविती अर्थ दृष्टी,
मधुरिपुमय तेव्हां नामनिष्ठांस सृष्टी;
वसति सकळ भूतें भूषणें जेंवि हेमीं,
हरिमय जग देखे वासुदेवाख्यधामीं.
नर पुरुष असीं हीं जीवनावें अपारें,
गुणमय नरतत्वें बोलिजे त्यांस नारें,
अयन सकळ नाराधार आत्माच साचा,
मुनिवर वदती हा अर्थ नारायणाचा.
मृषा सर्व आधार त्याला गुणाचा, असे सर्व नारांसि नारायणाचा;
जगत् व्यक्त अव्यक्त हें सर्व नारें प्रकाशी चिदात्मा तदाधार सारें
व्यक्त प्रपंच नभआदिक पंचभूतें
अव्यक्त बुद्धि मन मीपण आणि चित्तें;
नारें असीं अयन आश्रय याच नारां
नारायण प्रभु खरा, लटक्या विकारा.
नारांसि जो आश्रय या प्रकारें नारायणा आश्रय तेंचि नारें;
नारांसि जो आश्रय ईश झाला, तो जीव कीं आश्रय हे जयाला
नारायणाश्रित अशेषहि जीव नारें
भूमीवरी असति, जेंवि नदींत नीरें.
पाण्यांत त्या दरडिं दीसति जीव तोही,
नारायणात्मक दिसे प्रतिबिंब देहीं.
साक्षी विमुक्तजनआश्रय आणिखीही
नारायणार्थ बहु बोलति अंत नाहीं;
हीं ज्ञानगम्य हरिचीं गहनार्थ नामें,
यावेगळी सुगम जीं गुणकर्मधामें.
मेघश्यामल कोमलांग म्हणतां जो सांवळा कोंवळा,
श्रीपीतांबर नाम दाखवि मनीं कासेस सोनेसळा;
वाचे कौस्तुभकंठ नाम म्हणतां तें रत्न दावी गळां,

भूभारांतक तो रणांगणिं दिसें दंडी खळांच्या कुळां.
श्रीरामा म्हणतांचि जो करिं धरीं कोदंड सीतापती,
गोपीवल्लभ वेणु लावूनि मुखीं दावी विचित्रा गती
लक्ष्मीवल्लभ विष्णु शेषशयनी चक्रादि चिन्हें करीं,
ब्रम्हा दाखवि पद्मनाभ म्हणतां तो नाभिपद्मोदरीं.
या श्लोकीं अकराविया चरण हा चौथा कसा वाटतो.
जैसा वामनवामपाद गगनीं ब्रम्हांड तो आटतो.
गंगा त्यांतुनि ही जसी त्रिभुवनीं, टीका तयाची असी
येथें ‘ नामसुधा ’ मधूनि निघतें त्रैलोक्यकर्णी तसी
नामी असे अर्थ अनेक जेथें, सिद्धांत हा जो ग्रथितार्थ एथें;
कीं नाम नाशी अतिपापराशी, नामार्थ पापें सहमूळ नाशी.
स्फुरे अर्थ वाचेसि ये नाम जेव्हां हरी पातकें आठवे नाम तेव्हां.
धरी कीर्तनीं चित्त नामार्थ गोडी सुखें सर्व सोडी तईं पापखोडी.
प्रायश्चित्तें सर्वही व्यर्थ जेव्हां, नामीं ऐसी शुद्धि अत्यंत तेव्हां,
या श्लोकाचा अर्थ भावार्थ ऐसा, चित्ताकाशीं चित्सुधारश्मि जैसा.

चरण दुसरा

( श्लोक )

प्रायश्चित्तें बहु, परि न तीं शुद्धि अत्यंत देती,
जैसीं नामें सुलभ हरिच्या जीं गुणां सूचवीती.
तेथें जेव्हां मन रुचि धरी तो पडे केंवि पापीं
ऐसे पूर्वी विशद वदले विष्णुदूत प्रतापी.

आतां म्हणाल असि होवुनि विष्णुभक्ती, दुर्वासना जरि करी विषयीं प्रसक्ती,
हेही न केवळ विशुद्ध म्हणाल जेव्हां, सांगो रहस्य म्हणती हरिदास तेव्हां.
नामींच शुद्धि, जरि आचरला तथापी धांवेल तेंचि मन मागुति त्याच पापीं,
तेही न शुद्धि बरवी परि याच नामीं जें शुद्धसत्व मन तें न बुडेल कामीं.
नकळत महिमाही, जाळिती सर्व पापें त्रिभुवनपतिनामें आपुलीया प्रतापें;

पुनरपि मन पापीं धांवतें तें न धांवे, जरि हरिगुणगोडी अंतरंगीं ठसावे.
ऐसी तथापिहि न इच्छिति शुद्धि कामी कामीं प्रवर्तति जरी हरिच्याच नामीं;
जे इच्छितील असि शुद्धिहि दीर्घबुद्धी त्यांची त्वरेंकरुनि होइल सत्वशुद्धी.

विषय तामस राजस, इंद्रियें गढुळ, सत्व अखंड गुणद्वयें,
विषय वाटति गोड बहू मना म्हणुनि सोडवती न कधीं जना.
करिति कीर्तनही हरिचे मुखें, परि मनीं अतितुच्छतरें सुखें,
मन निघो विषयांतुनि ये रिती, विषयनिष्ठ कदापि न इच्छिती.
करिति कीर्तन ते समयीं हरी वदति मात्र, परंतु न अंतरीं;
प्रकटतो मनिं माधव जे स्थळीं प्रबळ ते स्थळिं काम न हा बळी.
विषय शत्रु मनीं जयिं वाटती मनिं तया हरिचे गुण दाटती;
विषयपाश अशेषहि तूटती, मग कधीं कुपथीं न रहाटती.
परि न शुद्धि असी जन इच्छिती तरति जे असि शुद्धि अपेक्षिती;
जरि अपेक्षिति काय तयां उणें? परम शुद्धि रमापतिच्या गुणें.

रज तम गुण दोन्ही दुष्ट अत्यंत, यासी
हरिगुणअनुवादी छेदिती निश्चयासी.
करुनि विमळ सत्त्वा त्या नरा सत्वधीरा,
पुनरपि अणु लागों नेदिती पापवारा.

असिहि शुद्धि अपेक्षिति जे जनीं त्वरित ते तरती हरिकीर्तनीं,
म्हणुनि निर्णय हा अतिनिश्चयें कथियला हरिच्या भृतकीं स्वयें.
परमशुद्धि न इच्छिल तो जरी, करिल शुद्धहि पाप पुन्हां तरी;
म्हणुनि संशय हा धरितो गळां, तरि पहा तुम्हि येथ अजामिळा.
सुतमिषें घडतां हरिकीर्तनें पतित उद्धरिलाचि जनार्दनें;
परिहरूनि कुसंग सुसंगती करुनि दीधलि त्यासहि संगती.
सहज कीं हरिकीर्तन जो करी सुमति त्यासहि देइल तो हरी;
परम शुद्धिहि जे जन इच्छिती, सुमति दे हरि तोचि रमापती.
परि मनीं अतिशुद्धि अपेक्षिती, त्वरित ते फळ उत्कट पावती.
त्यजिति ते विषयात्मक वासना, जितांचि मुक्ति अहो! मग त्या जनां.
म्हणुनियां मथितार्थ कसेपरी पतितपावन यो वदनीं हरि.

त्वरित नासति पूर्विल पातकें, मग हरी हळु दाविल कौतुकें.
इतर शुद्धिहि तो हरि देतसे, परि जसा क्रय विक्रय होतसे.
करिति जे व्रत तीर्थ तपें जसीं, हरि विशुद्धिहि देत असे तसी.
निज अपत्यजना सकळांपरी सकळ लक्षिति लोक असा हरी;
वदनि नाम अखंड जयांचिया करि समस्तहि शुद्धि तयांचिया.

म्हणुनि ये रितिनेंचि अजामिळा, सुमति देवुनि सोडवि तो गळा;
श्रवण हें निजदासमुखें तया करवुनी करितो हरि हे दया.
इतर शुद्धिस हा महिमा नसे, अजितनाम न जेथ मुखीं वसे;
म्हणुनिया जन हो! भलत्यापरी पतितपावन यो वदनीं हरी.
पतितपावननामपदें जसीं करिति शुद्धि न तीं इतरें तसीं
म्हणुनि नेवुं नका नरकाप्रती द्विज असें हरिकिंकर बोलती.

नेवूं नका तुम्हि अतःपर या द्विजाला, संहार ज्यास्तव अघां सकळांस झाला;
कीं जेधवां मरणकाळिं मरों निघाला, तेव्हांमुखीं पतितपावन विष्णु आला.

मरणसमयिं त्याचें नाम वाचेसि आलें,
म्हणउनि अघेंही पाप याचें जळालें;
जिताचि अजित नामें हीं न जेव्हां समर्थें,
म्हणउनि मनिं शंका श्रोतयां या श्रुतार्थें.

अभिप्राय हा व्यक्त होईल जेव्हां, मनींहूनि शंका निवारेल तेव्हां.
` ! वर्णिला मूळ पद्यार्थ ऐसा बरा आयका येथ भावार्थ कैसा.
पूर्वश्लोकीं वासनात्यागरीतीं, जे का शुद्धी इच्छिती, त्यांस होती;
ऐसे जें कां बोलिले त्या द्विजांला, नाहीं झाला येथ संदेह ज्याला.
अशेष पापें म्हणतां जळालीं, जे शुद्धि त्याला न कळोनि झाली;
तो मृत्यु येतां इतुक्यांत कांहीं कुकर्म झालें तरि शुद्धि नाहीं.
असें बोलती दूत चित्तीं यमाचे म्हणोनी मनीं दूत सर्वोत्तमाचे;
विचारूनियां बोलती मृत्यु तेव्हां, मुखीं याचिया स्वामिचें नाम जेव्हां.

'देहावसानसमयीं जरि पाप झालें, देहावसानसमयीं जरि नाम आलें;
कांहींच शुद्धि नसली जरि त्यासि पूर्वीं, हें एक नामचिहि शुद्धि करील पूर्वीं.
हा अंतकाळ नरकाप्रति जावयाचा, काळीं अशाहि गर्जलि नाम वाचा;

८८३८

मागील सर्वहि अहो! अघ तें जळालें; धाकेंचि जे नरक सर्वहि ते पळाले.
नेवूं नका म्हणुनि जे म्हणतों तुम्हांला, तें नाम शेवटिल हें फळलें, द्विजाला;
पूर्वीं मुखीं सुतमिषें हरिनाम आलें, तें नाम यासि अतिशुद्धिसि हेतु झालें.
हा आजि नाममहिमा श्रवणासि आला, सत्संग जो क्षणहि हाचि फळेल याला.
टाकूनि संग भजतां हरिनाम घोषें दुर्वासना जळति त्या अघबीजशेषें.'
गंभीर भाव हृदयांत धरूनि ऐसा, ते बोलले अजितकिंकर बोल तैसा,
कीं प्राणयानसमयीं हरिनाम जेथें, नेवूं नका पुरुष तो नरकास तेथें.

येथें सूचविलें जनांस सकळां दूतीं हरीच्या असें,
कीं देहीं हरिनाम अंतसमयीं येणार वाचे कसें?
जैसें पुत्रमिसें अजामिळमुखीं जें नाम होतें सदा,
आलें तेंचि तदर्थ नाम हरिचें गर्जा मुखीं सर्वदा.

म्हणाति ते हरिकिंकर यावरी, 'तुम्हि म्हणाल न हा स्मरला हरी,
सतत हा स्मरला निजआत्मजा घडलि शुद्धि म्हणाल कशी द्विजा?
तरि सुधा कसिही पडतां मुखीं हरि जरामरणांसि, करी सुखीं.'
धरुनि भाव मनांत असा बरा, वदति वैष्णव त्या यमकिंकरां.

सांकेत जीं निजसुतादिनिमित्त नामें, संकेतरूप रचलीं परि शुद्धिधामें.
गोविंद नाम हरि माधव चक्रपाणी कोण्या मिसें तरि वदो, परि धन्य वाणी.

हरि हरि म्हणुनी हा नाचतो काय वेडा?
अज अजित म्हणूनी गर्जतो काय रेडा?
मुखिं हरि परिहासें ये अशाही प्रकारें
तरि जळतिल पापें पापियांचीं अपारें.

घडि घडी वदनीं हरि आळवी, स्वहरिदासपणें जन चाळवी;
सकळ पापकुळें जळती तरी, करुनि दंभ हरी म्हणतो जरी.

हरिकथा उदरार्थ जरी करी, स्वगुण नाम करी भलत्यापरी;
विकितसे उदरार्थ फुलें जरी, शुभ सुगंध कधीं न चुके तरी.

'हरि! हरि! हरि!' ऐसें बोलतां काय होतें?
'हरि हरि' म्हणती हा नावडे शब्द मातें.
हरि म्हणति असाही हेळणेनें तथापी

'हरि हरि' म्हणतां तो होय निष्पाप पापी.
कोण्या मिसेंकरुनि ये हरिनाम वाचे, जे पापराशि अवघे जळतील त्याचे;
वाचे जरी सुतनिमित्तक नाम आलें, सांकेत्य कीर्तनमिसें अघ तें जळालें.
आतां म्हणाल, 'हरिनाम समस्त पापें नासूनि उद्धरिल हीं सहजप्रतापे,
दुर्मृत्युनें मरति, दुर्गति सिद्ध याला दुर्मृत्युचे नरक चूकति केंवि बोला?
'तरि न दुर्मरणें करि दुर्गती' म्हणुनियां हरिकिंकर बोलती;
'जरि हरिस्मरणें मरणें घडे भलतसें नरकीं न तरी पडे.'
पडे, अडखळे, गळे, करपदादि भंगे, मरे.
डसे भुजग, अग्निहीकरुनि जीविता अंतरे.
मरेल जरि मारितां, तरि न त्या नरा यातना,
स्मरेल मरतांच जो विवशही जगत्पावना.

विवशतेन मुखा हरि ये तरी, नर वदे हरिनाम सदा जरी,
म्हणुनियां हरिनाम सदा मुखीं जपति गर्जति तेचि जगीं सुखी.
प्रायश्चित्तें नासती पापमात्रें, बीजें त्यांचीं राहती तीं विचित्रें,
तींही जाती, आवडे नाम जेथें, ऐसें मागें वर्णिलें स्पष्ट येथें.

पूर्वी येथें विशद कथिलें कीर्तनाच्या प्रतापा
आतां सेवा हरिचरणिंची जे स्तुति स्तोत्ररूपा,
तेथें नामेंकरुनिच महा पातकी शुद्ध होती,
ऐसें बोलों म्हणुनि हृदयीं चिंतिलें विष्णुदूतीं
जीं कीर्तनीं तारक विष्णुनामें, सेवा मिसें तींच विशुद्धिधामें
आतां असें बोलति तेचि वाचे श्लोकद्वियें किंकर माधवाचे.
थोरां थोरें, लाहना लाहनालीं प्रायश्चित्तें ब्राम्हणीं बोलियेलीं;
पापें त्यांनीं भस्म होती, तथापी राहे जें कां चित्त जें पापरूपी.
मळ अनादि मनांत कुवासना हरि तिला हरिपादउपासना;
भजनिंही हरिनामक मंत्र ते अजितनामक सर्वहि तंत्र तें
स्तुति स्तोत्र सन्मात्र सूक्तें विचित्रें समस्तांतरीं विष्णुनामें पवित्रें.
करीती तिहीं पुंडरीकाक्षपूजा, हरी श्रीहरी त्यांचिया पापबीजा.
असिच धर्मसुताप्रति भारती वदलि जान्हविनंदनभारती;

' पुससि तूं जरि धर्म युधिष्ठिरा वदतसें मज जो गमला बरा. '
हा श्लोक भीष्ममुखिंचा परमार्थ जेथें भाषेकरूनि वदिजेल तदर्थ येथें
स्तोत्रें स्तुती करुनि जे हरिभक्तिपूजा हा एक धर्म दिसतो मज धर्मराजा

या धर्मा सकळांत संमत मला तो धर्म हा आगळा,
नाहीं त्यासम धर्म आणिक नृपा तो धर्म यावेगळा.
जो स्तोत्रें दृढभक्तिनें प्रतिदिनीं गोविंद हा पूजणें,
ऐसें कृष्णसमीप भीष्ममुखिंचें श्रीभारती बोलणें.

नामप्रताप हरिचा सकळां पुराणीं व्यासादि बोलति मुनीश्वर वेदवाणी;
याकारणें परम नासचि जेथ तेथें जें प्रस्तुती वदति हें हरिदूत येथें

असें कीर्तनें आणि सेवादिरूपें महा शुद्धि दे विष्णुनाम प्रतापें,
न जाणोनि जाणोनि उच्चारितांही हरी पातकें येथ वैषम्य नाहीं
जसजसा अति सादर कीर्तनीं तसितसी हरिभक्ति फुगे मनीं,
परि पुरातन पातक तों नुरें भलतसें हरिनाम वदो, पुरें.
वदति येथुनि पद्ययुगें रसें अजितकीर्तन हें उपमामिसें;
गमन ते करिती मग तेथुनी, शुक वदेल अतःपर येथुनी.

नकळत कळतां घे उत्तमश्लोकनामें
सहज निजगुणेंही नासती पापधामें
नकळत कळतांही घालिती अग्नि जेथें
करि सहजगुणें तो भस्म जाळूनि तेथें.

श्रीउत्तमश्लोक म्हणूनि त्याचें श्लोकांत या वर्णिति नाम साचें
सत्कीर्ति जे श्लोक तिला म्हणावें, जे विष्णुनामात्मक रूप भावें.
गोपाळबाळ म्हणतां व्रजबाललीळा, नामें सुचे हृदयिं केशवकीर्तिमाळा;
गोपांगनारमण नाम विलासलीला वीहार सूचवि असें हृदयीं तयाला.
वदनिं नाम धनंजयसारथी उभय कृष्ण मनीं दिसती रथीं;
शतसहस्र असीं हरिनामकें अजितकीर्तिसुधारसधामकें.
ऐसीं जगत्पावन विष्णुनामें वैकुंठकीर्त्यात्मक पुण्यकामें
नेणोनि जाणोनि मुखासि आलीं, पापें तयाचीं अवघीं जळालीं.
न अग्नि टाकी स्वगुणाहि जेव्हां टाकी कसें नाम गुणासि तेव्हां ?

जाळी स्वनामेंचि अघें अपारें ते उत्तमश्लोक अशा प्रकारें.
नामें हरीचीं हरिकीर्तिरूपें न नाशितीं हीं जरि लोकपापें;
प्रसिद्धमात्रेंचि कसें म्हणावें तो उत्तमश्लोक म्हणोनि नांवें.
विख्यात पापी बहुसाल होती, वेदीं पुराणीं श्रवणासि येती;
तसी नव्हे कीर्ति रमापतीची तारी जगा ख्याति अशीच तीची.
हरी पाप तें नाम कोण्या प्रकारें, स्मरे सादरें त्यासि सौख्यें अपारें;
जसी नेणतां औषधी रोग नाशी, पुढें सेवितां तेचि दे सौख्यराशी.
करि अहो ! गुण कांचन औषधी, न करि कां हरिनामसुधानिधी ?'
धरुनि भाव असे मित बोलिले, मग उगे हरिकिंकर राहिले.

## चरण तिसरा.

### ( श्लोक. )

अजितनाममहत्त्व अशा परी कथियलें बरवें हरिकिंकरीं.
उभयदूत अतःपर वर्तती कथिल तें शुभ भूमिपतीप्रती.
शुक म्हणे, 'हरिकिंकर ये रिती परम वैष्णवधर्म तयांप्रती
करुनि निर्णय ते यमपाशही द्विजनिबंधक तोडियले तिहीं.'
दूतीं यमाच्या मग काय केलें ? अजामिळाचें मग काय झालें ?
अध्यायपर्यंत मुनींद्रवाणी बोलेल हें सर्व महापुराणीं.
यानंतरें कुपित ते यमदूत तेथें गेले त्वरेंकरुनियां यमधर्म जेथें.
वृत्तांत हा वदति संयमनीपतीला जो कां जगीं त्वदनुशासनभंग झाला,
आतां द्विजें क्षणहि वैष्णवसंगतीनें केलें पहा स्वहित जें वृषलीपतीनें
सांगेल तें शुकमुनींद्र महीपतीला, तें आयिका, द्विज सुमंगल कैंवि झाला.
'नृपा ! विप्र निष्पाप निष्पाश झाला, भयें सोडिलें सर्वथा त्या द्विजाला,
करी वंदनें दूत पादांबुजाला धरी मस्तकीं आदरें त्या रजाला.
विप्रास आयुष्य असोनि देवें यमासही मोहुनि वासुदेवें
तो दूतहस्तें द्विज आणवीला स्वकिंकरांहातुनि सोडवीला.
स्वकिंकरांच्या वदनें तयाला श्रीवल्लभें हा उपदेश केला
यानंतरें वांचतसे द्विजाती ऐशामध्यें ते हरिदूत जाती.

अयुष्य शेष म्हणऊनि पुन्हां शरीरीं विप्र प्रवेश करि सूक्ष्मशरीरधारी,
त्या देखतांचि हरिकिंकर गुप्त झाले, अस्ताचळाप्रति दिवाकर च्यारि गेले.
त्यानंतरें वृत्ति अजामिळाची कथा महत्संगतिच्या फळाची
श्लोकत्रयें प्रस्तुत त्या द्विजाला हें सांगतों कीं अनुताप झाला.
अनंतदूतांसि कृतांतदूतीं निवेदिली वैदिकधर्मरीती
अन्याय ते सर्व अजामिळाचे निवेदिले, दंडहि त्या फळाचे.
कृतांतदूतांसि अनंतदूतीं निरूपिले वैष्णवधर्म संतीं
सद्भक्ति त्यांच्या वचनें द्विजाला ऐकोनि पापें अनुताप झाला.
म्हणतसे, ‘ मम कर्म पहा पहा वृषलिपासुनि वारदहा दहा
उपजलों उदरांत अहा ! अहा ! पतित मी पतितांत महा महा.
ब्राह्मण्य म्यां बुडविलें वृषलीपतीनें आयुष्य हें दवडिलें अति दुर्मतीनें. ’
ऐसें स्मरोनि निज सर्व कुकर्म पापें दुःखी अजामिळ बहु स्वकृतानुतापें.
श्लोकत्रयेंकरुनि आणिकही स्वकर्मे तो आठवील घडलीं जितुकीं अकर्में
जों पूर्वकर्मअनुताप मनास नाहीं तों सत्पथीं रुचि मना उपजे न कांहीं.
जें दीपतुल्य कुळ काजळ त्यांत झालों, धिक्कार हा मजाचि जो कुपथीं रिघालों.
स्त्री धाकुटी, बहु भली, तिस टाकिलें म्यां; जे मद्यपी धरिलि ते वृषली अगम्या.
परम वृद्ध पिता जननी वरी मजविणें गति ज्यांस न दूसरी
बहु तपोनिधि आणि तपस्विनी त्यजियलीं अकृतज्ञपणें वनीं.
आतां मला नरक होतिल मोठमोठे, धर्मघ्न जेथ पचती अतिदुष्ट खोटे. ’
ऐसा अजामिळ मनीं बहुतप्त झाला एथूनि वर्णितिल जें घडलें द्विजाला.
नरकहरणचिंता प्राप्त होतां द्विजाला, स्मृतिगत हरिदासप्रोक्त वृत्तांत झाला.
द्विज मग हरिनामीं आत्मकल्याण मानी म्हणुनि कथिल आतां पंचपद्येंकरूनी.
श्लोकद्वयें आठवुनी तयाला, संवाद अन्योन्य जयांत झाला.
श्लोकत्रयें ब्राह्मण त्या करूनी कल्याण माझें म्हणऊनि मानी.
म्हणे, ‘ हें प्रत्यक्षें नयनिं दिसलें, स्वप्न अथवा,
तिघे कोठें गेले धरुनि मज जे वोढिति जिवा
अहा ! गेले कोठें पुरुष चवघेही जिहिं मला
बळें त्यांपासूनी हरुनी नयनानंद दिधला.

मी तों अगण्य पतितांतहि अग्रगण्य प्रख्यात मद्यप तथापिहि काय पुण्य ?
कीं देखिलें नयनिं त्या विबुधोत्तमातें तेणें प्रसन्न मन नाशितसे तमातें.
नाहींतरी मज अमंगळ पापियाचे, ये केंवि या मरणिं माधवनाम वाचे ?
मी दुष्ट नष्ट अतिपातकि काम खोटें, नारायणा म्हणुनि मंगळ नाम कोठें ?
ऐसें असोनिहि मुखीं हरिनाम आलें, नेणों महासुकृत कोठुनि हें उदेलें.
मी तों स्वयें पतित निर्लज विप्रहंता होणार काय मज हें न जयासि चिंता.

द्विज असें शुभसूचक मानुनी स्वहित केवळ चिंतिल एथुनी
कथिल तो सुमनोरथ निश्चयें शुक मुनीश्वर पद्यचतुष्टयें.

द्विज अतःपर यत्न म्हणे करूं पवनइंद्रियचित्तहि आवरूं
मन बुडे न तमांत पुन्हां जसें करिन साधनवृंद म्हणे तसें.

छेदूं बंद अनादिही प्रथम जो झाला अविद्याबळें
जीच्या आवरणें सुखासि सरतां दुर्वासनेचीं कुळें
विक्षेपें बहु कामना उपजतां, कर्में करी वोंगळें
त्यांचीं भोगिलिया विणें न चुकती जीं कर्ममूळें फळें.

सांख्यें आत्मअनात्मता निवडतां, शब्दें अविद्या हरूं
योगज्ञानहुताशनांत अवघ्या वृत्तींसिही संहरूं
तेव्हां संचित नाशतां, उपजती कर्में अकर्मेपणीं
प्रारब्धासहि भोगितांच सरऊं ऐक्यें उरूं निर्गुणीं.

जों प्रारब्ध असेल तोंवरि भजों सर्वात्मभावें हरी,
पाहों तो स्थिरजंगमीं बहुघटीं मातीच जैसी खरी
जे मध्यस्त अमित्र मित्र अवघे तद्रूप पाहों स्वयें
सर्वांचा प्रिय सोयरा निजसखा आत्मा असा निश्चयें.

ऐसे निश्चय गुंफितां, वृषलिचे फांसे गळां प्रीतिचे
देखे, आठवती विशेषहि रतिक्रीडादिकीं जे तिचे
या पापेंचि कृतांतपाश पडले होते पहा हो ! मला
ऐसें आठवितां विरक्ति उठतां तात्काळ झाला भला.

ऐसे हे विषयांत दोष नसतां कां टाकिती हो ! भले
मिष्टान्नीं विष, ये रिती विषय ते त्या ब्राह्मणा वाटले

बोले प्रस्तुत आर्यकार्य करणें कीं हे जगन्मोहिनी
माया स्त्रीसम ईस टाकुनि निघों निःसंग संगीं वनीं.
करुनि मर्कट नाचविलें मला, कट कटा अतिलंपट मी तिला
प्रियतमा अधमा मज वाटली, वय समस्त घडी जसि लोटली.

हा देह मी म्हणुनि मानुनि दुष्टकर्मे आयुष्य म्यां सरविलें अवघें अधर्मे
प्रत्यक्षही जड असत्य जिता शवाला नाहीं प्रतीति इतुकें न कळे जिवाला.
आतां म्हणे द्विज अहंममता शरीरीं टाकीन जे चिर तृषा रविरश्मिनीरीं
उल्लंघणें कठिण यद्यपि विष्णुमाया तन्नामकीर्तनउपाय असे तराया.
करिन कीर्तन मी दिनयामिनी, स्फुरति कामगृहें सुतकामिनी,
जसजसें सुख होइल कीर्तनीं तसतसा मग निर्लज नर्तनीं.

अशा कीर्तनीं नर्तनीं चित्तशुद्धी त्वरें होवुनी होतसे ध्यानशुद्धी;
हरीच्या पदीं स्थैर्य चित्तास जेव्हां, स्फुरे विष्णु आत्मा स्वतःसिद्ध तेव्हां.
उपजले सुमनोरथ जे जसे द्विज समस्तहि आचरला तसे
त्यजिल सर्वहि तो मन नेमुनी, म्हणुनि एथुनियां वदतो मुनी.
क्षणैकसत्संगतिच्या फळानें केलें तसें सर्व अजामिळानें
उदासता ते रुचली द्विजाला सांडूनि दासी हरिदास झाला.
गंगाद्वारासि गेला, मनिंहुनी पहिला संग तो टाकियेला,
गातां वाचे हरीला मळमळ हरिला, श्रीहरी मोहरीला
ध्यानीं तन्निष्ठ झाला, हृदयिं उमजला विष्णु आत्मा द्विजाला,
ध्यातां श्रीमाधवाला भवदव शमला, नामनादें निवाला.
द्विजाची शुकाचार्य वैकुंठयात्रा वदू पाहतो पंडुच्या पुत्रपौत्रा
असे मूळिंचे पांच हे श्लोक आतां, करीतील टीका मुखें सौख्य गातां.
क्वचित् गंगातीरीं हरिगृहिं हरिद्वारनगरीं
निजा चिंता योजी द्विजवर चिदाकाशकुहरीं
दृढ प्रत्याहारें नियमुनि मनीं इंद्रियगणा
चिदाकारें चित्तेंकरुनि भजतां विप्र अगुणा.
चिदाकाराचित्ताहुनिहि निज आत्मा पलिकडे
असें योगी पाहे तरिच मनिं हे उन्मनि पडे

चिराकारें आहे मन म्हणुनि राहेल तितुका
निरोधी त्या वृत्ती उपजतिल हा योग इतुका.
न जेथें चिच्छक्ती सहजचि असे निर्गुणपणीं
अखंडानंदाचा अनुभव असे ऐक्यसगुणीं,
असे देवा जीवा सहज अगुणीं ऐक्यचि परी
असा आत्मा पाहे तरिच कळला त्यासिच हरी.
अशा अनुभवीं दिल्ही बुडि अजामिळाच्या मनें
समाधि सरतां मनीं किमपि इच्छिलें चिंतनें
अशांत हरिदास ते नयनिं चौघही देखिले
द्विजें वळखिले मनीं सतत जे सुखें रेखिले.
करी जों नमस्कार चौघां जणांला जसे चौघ ते पांचवा विप्र झाला
पडे अंग पूर्वींच गंगाप्रवाहीं भुजा चारि देखे नव्या दिव्यदेहीं.
करिं गदांबुज अंबुदसांवळा कटितटीं तडिदंबर मेखळा,
सतत षोडशवार्षिक कोंवळा हरि करी हरिनाम अजामिळा.
जलज शंख रथांग गदा करीं, कनकरत्नविमान तयावरी,
द्विज अजामिळ तो हरिकिंकरीं मिरविला हरिपार्षदशेखरीं.
असा विप्र वैकुंठलोकासि नेला, फिरेना पुन्हां, जो असा तेथ गेला.
म्हणूनि स्वयें श्रीपति स्वामि जेथें ऋषी बोलतो पावला विप्र तेथें.

## चरण चवथा.

### ( श्लोक. )

जेथेंचि श्रीपति, अजामिळ तेथ नेला. ऐसें मुनींद्र नृपतिप्रति बोलियेला.
भावार्थ कीं न चवती जन त्या विभागीं, तो पावला गति अजामिळ नामयोगीं.
श्री भू दुर्गा भाग हे तीन जेथें, श्रीवैकुंठीं पावती धन्य तेथें
ज्ञानी भक्त श्रीविभागास जाती, तैशा स्थानालागिं गेला द्विजाती.
जय विजय गळाले ते न त्या श्रीविभागीं
गतभवतमशेषें विप्रशापप्रसंगीं;

गज जलचर पूर्वीं दोघ अन्योन्यशापें
गति परमहि जे कां ते न भक्तिप्रतापें.
लव जरी असती हरिभक्ति ते उभय बंधु धनार्थ न शापिते,
म्हणुनि त्याच मतें सनकादिकां कुवचनें वदले हरिसेवकां.
कृष्णार्पणें करुनियां तप यज्ञ तीर्थें पुण्यें अगण्य बहु जोडियलीं समर्थें
नेलें म्हणूनि हरिनें स्वपदासि दीना, श्रीभाग लभ्य न म्हणोनिहि भक्तिहीना.

श्रीमद्भागवतीं गजेंद्र हरिनें जो सोडवीला स्वयें
इंद्रद्युम्न नृपाळ जो गतभवीं तो वेगळा निश्चयें
हे तों पद्मपुराणिंचे निज सखे भाऊ धनाकारण
देती शाप परस्परें द्विजपणीं ‘ हो नक्र हो वारण. ’
गजपति धरिला तो गंडकीमाजि नक्रें
स्तुति करि गज तेव्हां मारिला नक्र चक्रें.
जय विजय असे ते दोघ वैकुंठवासी
असुरपण पुराणीं विप्रशापें तयांसी.

द्विजवर हरिनामें शुद्ध अत्यंत झाला,
परिहरुनि अविद्या आत्मतत्वीं निवाला.
म्हणवुनि हरिनें तो श्रीविभागास नेला
पुनरपि परतेना जो असा तेथ गेला.
या कारणें श्रीशुक बोलियेला कीं, ‘ जे स्थळीं श्रीपति तेथ गेला,
दुर्गापती भूपति जेथ तेथें गेला न, भावार्थ असाच एथें. ’
कोण्ही कैवल्य मोक्षाविण न गणिति, ते बोलती गौण मुक्ती,
जे कां अव्यक्तमात्रीं सतत रत जयां नावडे विष्णुभक्ती,
क्लेशें कैवल्य त्याला पुनरपि सगुणीं लाविलें अंतरंगा
होती सिंधूंत बिंदू हरिजन, मिळती सागरीं जेंवि गंगा.
घनाच्या मुखें सिंधुचा बिंदु जैसा मिळे सागरीं, निर्गुणीं मोक्ष तैसा.
सदा भेटते ऐक्य पावोनि गंगा समुद्रीं असी भक्ति हे अंतरंगा.
फिकी मुक्ति भक्तीपुढें ज्ञानियाला, स्वयें मुक्ति देती पहाती तयांला.
मुमुक्षूसही कामना मोक्षकामीं, न भक्तांस जे देखती मुक्ति नामीं.

पडे देह तों त्याचि देहीं मुकुंदा पहाती जगीं टाकुनी लोकनिंदा,
सरे कर्म त्याचे पडे देह जेव्हां, हरी ने स्ववैकुंठलोकासि तेव्हां.
मुमुक्षू जरी सेविती अंबुजाक्षा तरी मागती नित्य कैवल्यमोक्षा.
स्वभक्तां जरी मुक्तिचारी उपेक्षा हरी मुक्ति भक्ती तरी दे स्वपक्षा.
स्वभक्तांसही देवुनी दिव्य मुक्ती, हरी देतसे मुक्ति ही माजि भक्ती.
जसें नित्यमुक्तां न देहत्व देहीं असे देहसारूप्य मोक्षादिकांहीं.
अमृत केवळ होवुनि राहती परि सुधामधुरत्व न पाहती,
अमृत होवुनिही रसनामिसें अमृत सेविति भाग्य पहा कसें.

जनन मरण मेलें, दुःख अज्ञान गेलें,
हरिमय वपु केलें विष्णुलोकासि नेलें.
न जळति लव लोळे शेषवक्राग्निजाळें
घडतिल विधिगोळे ते न होतील काळें.

विकुंठासुतें निर्मिलें पूर्णकामें हरीनेंचि वैकुंठ वैकुंठनामें,
लयीं तें नुरे मोक्ष हो नित्य कैसें बरें नेणतां बोलती एक ऐसें.

विकुंठेच्या पोटीं हरि मनुजरूपें अवतरे,
तसी लोकाकारें तनु करुनि वैकुंठ पसरे,
यथाकाळें जैसे अजितअवतार प्रगटती
तसीं लोकाकारें सकळ हरिरूपें उमटती.

करी योगनिद्रा हरी शेषशायी, लयीं नीजती मुक्त त्याचेच ठायीं;
करी सृष्टि होवूनि जागा मुरारी तयीं ऊठती मुक्तही या प्रकारीं.
जयीं निर्मिली सृष्टि होती न कांहीं विकुंठेस हो! तेधवां ठाव नाहीं.
तयीं दाविला लोक जो ब्रह्मयाला विकुंठात्मजें निर्मिलें केंवि त्याला.
विकुंठेचिया जेंवि पोटासि आला, तसा लोकही तोचि वैकुंठ झाला;
विकुंठेचिया तोचि गर्भांत पूर्वीं कसा जन्मला जो सदा सर्व उर्वी.
निजेही लयीं सृष्टि सर्वांत जागे जगीं रामकृष्णादि होवूनि वागे,
तरी तें अनादित्व तैसें न भागे न वैकुंठलोकासि सादित्व लागे.

वैकुंठावरि काळचक्र फिरतें कोणी असें बोलती,
त्यांचे सर्वहि बोल फोल बरवें हें तत्व ते नेणती.

नाहीं षड्गुण ईश्वरत्वहि जरी तो योगनिद्रा करी
काळाचें तरि चक्र हें फिरतसे माना तयाही वरी.
काळीं ईशहि सांपडे, तरि गती दे कोण बोला अरे!
काळग्रस्त न काळपाश चुकवी ऐसें पहाना बरें;
तो जेव्हां निजतो लयीं जन निजे वैकुंठिचा तेधवां,
त्या योगांतुनि सर्व मुक्त उठती तो ऊठतो जेधवां.
द्रष्टा सर्व गिळूनि जोंवरि असे वैकुंठिंही तोंवरी
योगीं निद्रित तो तई निजति हें कांहीं न त्याऊपरी;
द्रष्टयावांचुनि रज्जु सर्प न दिसे द्रष्टाचि होतां दिसे
मायामात्रचि कंठरूप हरिचें तेथें अविद्या नसे.
नव्हे सर्प हा, हार मायाच देहीं, असी शुद्धमाया रमाकांतदेहीं;
असे शुद्धमायाच वैकुंठधामीं तया पावला विप्र तो धन्य नामीं.
वैकुंठासि अशा अजामिल असा नामप्रतापें करी
गेला भागवतीगतीस न करी कैवल्य जीची सरी.
नामाचा महिमा अतर्क्य निगमा तो एथ कांहीं मुनी
श्रीद्वैपायनपुत्र बोलत असें श्लोकद्वयें नेमुनी.
ज्याणें धर्म समस्तही बुडविले, जो निंद्य दासीपती;
जो नष्टव्रत, ज्यास नेत असतां भोगावया दुर्गती,
ऐशाही समयीं अजामिळ असा तत्काळ तो सूटला;
नामें श्रीहरिच्या अनादि रचला तो बंधही तूटला.
नाहीं त्याहुनि कर्मबंधन दृढच्छेदावया आणिखी
मोक्षापेक्षक त्यास कीर्तन सदा तैसें हरीचें मुखीं
नामें जें मन शुद्ध तें रजतमा टाकी तयावेगळें
तें कर्मीं न मिळे पुन्हा हरिगुणीं सप्रेम जें आगळें.
शुक म्हणे, ‘ भरतान्वयनंदना ! हरिल पातक कर्महि बंधना;
अजितकीर्तन ऐकाचि सर्वथा, इतर जें तप तीर्थ कथा वृथा.
प्रायश्चित्त न अन्य नामसम हें श्रोत्यां जरी बिंबलें;
गंगा काय करील ये रिति मनीं गंगा बहू तुंबलें;

एथें तीर्थपदानुकीर्तन अशा एका पदें श्रीशुकें
श्लोकीं सूचितसे सभे मुनिजना रायासही कौतुकें.

गंगाख्य तीर्थ चरणीं उपजे जयाचे, तो विष्णु तीर्थपद बोलति विप्र वाचे;
तीर्थांघ्रि तो म्हणुनियां म्हणतांचि पायीं गंगा दिसे अजितमाम समस्तदेहीं.
नामें स्फुरे तनु समग्र मनांत जेव्हां मंदाकिनी पदनखांत दिसेल तेव्हां,
व्यापूनि नाम असणार समस्त अंगा त्याची कसी सरि करी चरणांबुगंगा ?

पादांगुष्टींच गंगा त्रिभुवनपतिचें नाम हें अंगअंगा,
जे कां व्यापि विहंहंगासननखशिख ते दाखवी अंतरंगा;
गंगा ही पापभंगा परि हरुं न शके वासनेच्या कुसंगा,
हस्तीही तत्तरंगीं धुति विषयदिवा इष्टचित्तापतंगा

गंगेतही गज धुतला तथापि घाली शिरीं धुळि तसें जन चित्त पापीं
स्नानें करूनि जरि पावन देह झाला पापीं प्रवृत्ति घडणार पुन्हां तयाला.

म्हणाल ‘गंगा हरि पूर्व पापें, शुद्धी अशा नामसुधप्रतापें.’
दोहीसही मागुति पापवृद्धी होणार नामीं तरि काय सिद्धी ?
पूर्वींच हा निर्णय एथ झाला, नामीं द्विधा शुद्धि असे जनाला;
इच्छामात्रेंचि हरूनि पापा दावीतसे त्याउपरी प्रतापा.

आजन्म गंगास्नपनेंचि केलीं दुष्टेंद्रियें तीं विषयीं भुकेलीं,
गंगातटींही हरिकीर्तनानें संहारिला संग अजामिळानें.
करुनि तीर्थ तप व्रत मागती श्रवण कीर्तन केवळ सद्गती,
म्हणूनियां हरिनामसुधा जसी न गति जान्हवी देवूं शके तसी.
हरि जसें जळ अन्न तृषा क्षुधा, हरि तसी जनभूकतृषा सुधा;
परि सुधा अजरामरता करी न इतरे, हरिनाम अशापरी.

जगीं नानाकामी धरुनि रति नामींच तरले.
विरक्तीच्या धामीं धरुनि रति नामींच उरले;
सदा तीर्थग्रामीं तरि विषयभूमीं उतरले,
मुखेंही स्वर्गामी विषयविषधामींच भरले.

याकारणें तीर्थमदानुकीर्तनें दुर्वासनेपासूनियां निवर्तनें,
चित्तें असंगें हरिनामनर्तनें होतां न होतीं विषयीं प्रवर्तनें.

जरि म्हणाल 'अशा हरिकीर्तनीं विषयसंग न कां उपजे मनीं ?'
तरि शुकोदित उत्तर अर्ध हा विशद अर्थ करूनि बरा पहा.
हरिगुणीं उपजे रति जेधवां, रजतमीं न मिळे मन तेधवां;
सतत गुंफिल जो गुणरत्न तो न करि काचमणीप्रति यत्न तों.
अमृतसिंधूतरंग उठे मुखीं न मन आठवि आंबिल तें मुखीं,
हरिगुणी मन घे जरी आवडी, मग न दे विषयांत कधीं बुडी.
विषय राजस तामस इंद्रियें विमळसत्वचि मानस निश्चयें,
अमळसत्वहि तुच्छसुखस्पृहा रजतमाकरितां धरितें पहा.
असुखमिश्रित सर्वहि हीं सुखें सुखचि तें हरिकीर्तन जें मुखें,
जरि मनासि असें सुख आढळे रजतमीं न कधीं मग तें मिळे.
विषय कर्म असंग न घे मनीं निरत जो हरिकीर्तननर्तनीं,
म्हणुनी तीर्थतपोव्रत त्याहुनी अधिक हें हरिनाम ह्मणे मुनी.
हरियले जनसंशय हो ! शुकें कथियले हरिकिर्तन कौतुकें
प्रकरणश्रवणस्मृतिवर्णनीं कथिल पद्ययुगें फळ एथुनी.
जो हें असें नरकहारक गुह्य कर्णी ऐकेल, जो सदितिहासविलास वर्णी,
तोही न जाय नरका, न तयास डोळां पाहों कदापिहि शके यमदूतमेळा.
न जाय नरकाप्रती नवल काय हें भूपती ?
अमंगळहि पूज्य तो मनुज विष्णूलोकीं अती,
असा सदितिहास हा श्रवणवर्णनें सद्गती
करी जरी अनुष्ठवे, फळ न बोलवे तें किती.
फळ इतर पुराणीं तीर्थयज्ञव्रतांचें
वदति रुचिनिमित्तें तेथ तें लभ्य कैचें ?
न वदति फळ तैसें बोलणें तथ्य जेथें
कटुक रुचिनिमित्तें बोलती तींत एथें.
धर्मः प्रोज्झितकैतवोऽत्र म्हणुनी श्रीव्यास ऐसेपरी
षष्ठस्कंधमुखींच श्लोक दुसरा तेथें प्रतिज्ञा करी;

ज्या धर्मीं कपटार्थ लेशहि नसे तो ये स्थळीं बोलणें,
हा वाक्यार्थ म्हणूनि एथ अवघे नाणें खरें तोलणें.

जो लाभ या श्रवणवर्णनिं बोलियेला कीं तो अमंगळ तरीं हरिलोक त्याला,
श्रद्धेकरूनि हरिभाक्ति करूनि जेव्हां ऐकेल वर्णिल, फळप्रद होय तेव्हां.

श्रोता श्रद्धायुक्त ऐकेल जेव्हां तो वैकुंठालागिं जाईल तेव्हां;
जो भक्तीनें यासि वर्णील वक्ता श्लोकीं सांगे लोक हा त्याचि भक्ता.

श्रद्धा आस्तिकनामबुद्धि महिमा जो वर्णिती तो खरा,
ऐसा निश्चय बाणतां स्वचरणें वैकुंठ येतें घरा.

ऐसाही इतिहास हा परिसती त्यांला नुपेक्षी हरी,
त्यांची आचरणें अमंगळ जरी नासूनि तीं उद्धरी.

म्हणुनि शेवट पद्यहि ये रिती वदतसे शुक भूमिपतीप्रती;
प्रकरणश्रवणीं हरिकीर्तनीं तरति विस्मय हा न गमे मनीं.

मरों टेंकला विप्र पुत्रोपचारें, हरीचें वदे नाम लोकप्रचारें;
असा पातकी विष्णुलोकासि गेला, म्हणे भक्तिभावें उणें काय त्याला ?

प्रकरणश्रवणस्मृतिवर्णनें धरुनि भाव मनीं हरिकीर्तनें,
नवल काय जगीं जरि तो तरे ? श्रवणमात्र करूनिहि उद्धरे.

प्रकरणश्रवणेंहि तरे जई नवल काय अनुष्ठिल तीं तई ?
म्हणुनि भाव असा शुक बोलिला, तदनु ' नामसुधेंत 'त निरूपिला.

षष्ठस्कंधमुखीं अजमिळकथा अध्याय हा दूसरा,
श्रीमद्भागवतांत नाममहिमानिर्धार जेथें खरा.

टीका ' नामसुधा ' म्हणूनि रचिली हे वामनाच्या मुखें
श्रीकृष्णें सुरस प्रसन्नवदनीं कानीं मनीं दे सुखें.

---

# अध्याय तिसरा.

चरण पहिला

( श्लोक. )

अध्यायीं तिसऱ्या मुरारिचरणप्रेमें महानिश्चयें
दूतांतें यमधर्मराज वदतो नामप्रताप स्वयें.
ऐसें गुह्य कसें अहो ! प्रकटलें श्रोत्यांस हें विस्मयें
होती यास्तव वर्णितो मुनि नृपप्रश्नास पद्यद्वयें.
राजा पूसतसे, ‘ स्वसेवकजनीं हें वर्णिल्या ऊपरी
त्यांसी तो यमधर्म त्या अवसरीं बोले कसी वैखरी ?
आज्ञा मोडुनि पाश तोडुनि बळें वैकुंठिच्या किंकरीं
पापी सोडविला असें परिसतां बोले कसें त्यावरी ?
स्वामी ! हा यमदंडभंग कवणापासूनि आम्हीं असा
नाहीं आइकिला, तुम्हीं कथियला नामप्रतापें जसा.
हे इत्यादिक लोकसंशय जगीं छेदी असा दूसरा
नाहीं यास्तव धर्म काय वदला तो वाद सांगा बरा. ’

मुनिवरासि असें धरणीश्वरें चरित हें पुसतां अतिआदरें,
अजितनाममहत्त्वसुधारसें निववितो शुक मागुति या मिसें.
शुक म्हणे, ‘ नृपती ! हरिकिंकरी फिरविले यमकिंकर यापरी
सकळ सांगति सूर्यसुताप्रती स्वपति जो यम संयमनीपती.
कृतांतासही ऐकतां क्षोभ व्हावा धरूनि अशा बोलती दुष्ट भावा
असें बोलतां सप्तपद्यें विचित्र स्वयें सांगतों राजया व्यासपुत्र.
शुक म्हणें, ‘ यमदूत यमापुढें वदति कोपभरें वचनें दृढें
म्हणति, ‘ शासनकार अहो ! किती त्रिभुवनीं वद संयमनीपति !
करिति दंड उदंडहि जेधवा नियमभंगचि कीं मग तेधवां ?
सरलिया वय आणविशी जया इतर येवुनि सोडविती तया.

करिति दंड अनेक असे जईं, प्रभुपणें अवधोचि वृथा तईं;
सकळ मंडळनाथनृपासनें जसिं परस्पर मोडिति शासनें.
तुजचि आजिवरी प्रभु लेखिलें, न कधिं शासन आणिक देखिलें,
नवल आजिच हें जनिं वर्तलें , परम दुर्धर शासन पर्तलें.

पतित केवळ जो वृषलीपती द्विज तुझ्या वचनें नरकाप्रती
धरूनि चालवितां वरि सांवळे पुरुष चारि चतुर्भुज पावले.
तिहिं असें तव शासन मोडिलें, पतितबंधन तें दृढ तोडिलें;
कवण ते प्रभु ! सांग बरें परी श्रवणयोग्य असे असिले तरी.

आकर्षिला पतित घालुनि पाश जेव्हां, 'नारायणा !' म्हणुनि मारिलि हाक तेव्हां;
चौघांचिही उडि तया समयांत आली, आलों झणीं भिसि असी ध्वनि दीर्घ बोली.

महाराज ! ते सांग हे कोण वाचे ?' यमातें असें पूसती दूत त्याचे.
असें ऐकतां त्या यमें काय केलें ? शुकें हें वदायास आरंभियेलें.

शुक म्हणे, 'यमकिंकर ये रिती पुसति, ऐकुनि संयमनीपती
हरिपदांबुज हें स्मरला मनीं मग वदे हृदयीं सुख मानुनी.
यम म्हणे स्वमनीं यमकिंकरां मजविणें न दिसे प्रभु दूसरा,
म्हणुनि जो अखिलेश रमापती प्रथम वर्णिल त्यास तयांप्रती.

प्रभु मजविण मोठा ज्याचिया चित्स्वरूपीं
स्थिरचरजग ऐसें अंबरें तंतुरूपीं
स्थिति भव लय तीन्हीं अंशमात्रें करीतो
रविसुत म्हणतो कीं स्वामि माझा हरी तो.

स्वयें विष्णुरूपें करी जो स्थितीतें जगत्कर्तृता त्याच लक्ष्मीपतीतें
करी सृष्टि तो ब्रह्मरूपें मुरारी तसा रुद्ररूपेंचि संहारकारी.

वृषभनासिकिं घालुनि वेसनी वश करूनि जसा फिरवी धनी
सकळ लोक जया वश ये रिती अवधियांहुनि थोर रमापती.

ऐसेंच तत्व तरि टाकुनि वासुदेवा शास्त्रज्ञही करिति कां पर अन्यसेवा ?
ऐसे कथीं म्हणति ते परधर्म आतां याचें रहस्यहि वदेल तयां स्वदूतां.
लोकीं द्विपाद पशु सर्व मनुष्य झाले, दुर्वासनामय वनांत पळों निघाले,
बांधोनि त्यांस सकळांसहि उद्धरावें केलें तदर्थ निजवैखरिरूप दावें.

तद्वैखरी निगमरूपाचि थोर दावें जेथें अनेक गळबंधन देवनावें,
तेथें असो भलतिया गळबंधनीं तो कैसा तरी निगमदामनिबद्ध होतो.
दाव्यांत बद्धपशु जे तितुक्यांस चारा घाली धणी म्हणुनि धांवुनि येति दारा,
येवूनियां धरितसे पशु आपलाला थारा, तथापिहि न जाणति त्या धण्याला.
या कारणें निगम सर्वहि थोर दावें, इंद्रादिरूपगळबंधन त्यांत नांवें,
कोण्या मिसेंकरुनि वैदिककर्म केल्या स्वर्गादिसद्गति न दुर्गति त्यास मेल्या.
यज्ञादि सर्वहि फळें हरि तोचि देतो इंद्रादि मुख्य म्हणऊनि यजी जरी तो,
हे अस्मदादिक असीं निगमांत नांवें मूढा जनासि गळबंधन हेंच दावें.
आम्हांसि आहुति समर्पिति आणि पूजा, आम्ही शिरीं धरुनि पाववुं देवराजा,
दाव्यांत बद्धपशुवत् गळबंधनेंही आम्ही उपास्य परि बाह्य जसे विदेही.
आम्हांस सर्व अधिकारहि वासुदेवें हे दीधले विविध नेमुनि देवदेवें,
हीं शासनें शिरिं धरूनि भितों तयाला, आम्हां स्वतंत्रपण केंवि घडेल बोला?

यमास सर्वोत्तमतात याचे जे बोलिले दूत सकोप वाचे,
यमें दिलें उत्तर हें तयांतें स्मरोनि सर्वेश्वर विष्णु चित्तें.

## चरण दुसरा.

### (श्लोक.)

समस्तांहुनि थोर गोविंद ऐसें कळे जे रिती बोलिला धर्म ऐसें,
तयाचेच ते चौघही दूत आतां असें धर्म बोलों पहातो स्वदूतां.
तिहीं मोडिलें तूझिया संयमाला, असें बोलिले दूत जे कां यमाला,
वदाया तया गोष्टिच्या उत्तरातें पुन्हां वर्णितो धर्म सर्वेश्वरातें.
सगुणनिर्गुण एक रमापती, म्हणुनि वर्णितसे यम त्यांप्रती,
सगुण इच्छितसें नकळे कसें, कथिल पद्ययुगें पहिलें तसें.
मी धर्मराज सुरराज दिशाधिराजे ब्रह्मादिदेव ऋषि आणिक थोर जे जे,
नेणों तदिच्छित न जाणति तत्त्ववेत्ते ऐशास जाणति कसे जन आणि ते ते?
सगुणचेष्टित हें न कधीं कळे, अगुण तो कवणासहि नाकळे,
म्हणुनियां वर संयमनीपति अकळ निर्गुण वर्णिल त्यांप्रती.

प्राणेंद्रियादि सकळांसहि जो कळेना, वाचेस आणिक मनासिहि आकळेना,
शुद्धें मनें अनुभवाप्रति ये तथापी, तेव्हां पतंग मन होय चिदात्मदीपीं.
ऐसा अतर्क्य हरि त्या प्रभु माधवाचे ते दूत होतिल म्हणे यमधर्म वाचे,
श्लोकद्वयेंकरूनि हेंचि वदेल आतां टीकामुखें करूनि होइल सौख्य संतां.

तुम्हि मनोहर जे नर देखिले निजसुखात्मरसें करिं रेखिले
मज गमे बहुतेक रमापतीजवळि ते असणार महामती.

हरिगुण हरिरूपें दूत ते माधवाचे
हरिमय जग दृष्टीं पाहती नामवाचे;
सुरवर शिरिं त्यांच्या वंदिती पायधूळीं,
त्रिभुवनिं हरिभक्तां रक्षिती सर्वकाळीं.

जगिं अदृश्यपणें जन लक्षिती, भगवदीक्षणमात्र अपेक्षिती,
हरिजनासि कधीं न उपेक्षिती, मजहिपासुनि ये रिति रक्षिती.

'नारायणा !' म्हणुनियां म्हणतांचि वाचे ते छेदिले तिहिंच तैं दृढ पाश त्याचे,
कानीं मुखांत नरकांतकनांव जेथें कैंचें उरे नरकदुर्गतिदु:ख तेथें ?

वाटे तयां धर्म समस्त जाणों नामप्रतापास किमर्थ नेणों.
येथें पहा येविषयीं स्वदूता श्लोकत्रयें वर्णिल काय आतां.

श्रीमद्भागवतांत भक्त हरिचे सप्रेम वाखाणिती
जे साक्षाद्भगवन्मुखें प्रगटले कोण्ही तयां नेणती.

ते श्रीभागवताख्यधर्म कळती कैसे तुम्हांला अरे ! ?
जो बाराजण मात्र जाणत असो, ऐका तयातें बरें.
ब्रह्मा शंभु कुमार नारद शुक प्रल्हाद किंवा बळी
कीं वैदेहि मनु स्वयंभुसुत जो कीं कौरवांचे कुळीं
जो गंगासुत भीष्म आणि कपिल प्रख्यात कीं मी स्वयें
जाणों वैष्णवधर्म जो कळलिया प्राणी तरे निश्चयें.

हा श्रीभागवताख्यधर्म इतुक्यां बाराजणां ठावुका,
कां तो गुप्त असा म्हणाल, तरि तें सांगेन मी आइका.
जो कां गुह्य निजात्मबोध गुरुच्या भक्तीविणें नाकळे,
तो हा वैष्णवधर्म विष्णुकरुणेवाचूनि कैसा कळे ?

विज्ञान जें अतिरहस्य विशुद्ध वेदीं, तेथेंचि भागवतधर्म न भक्ति भेदीं,
ज्याकारणें प्रिय कलत्र सुतादि वित्तें तव्हांचि भक्ति जरि तो उमजेल चित्तें.

म्हणविती बहु वैष्णव आपणा, परि न जाणति भक्तिचिया खुणा;
हरि असें दुसरें जरि नावडे तरिच ते हरिभक्ति तयां घडे.

प्रिय हरि सकळांहुनि जाणती परि जयास्तव ते प्रिय नेणती,
भजति कीं सुख दे हरि आपणा प्रियतमीं निजजीव हरी उणा.
निजसुखार्थ धनादि जसीं प्रियें प्रिय हरी स्वसुखार्थचि निश्चयें,
धनं सुताहुनि आवडि आपुली तसि हरीहुनि भक्ति नव्हे भली.
भजति मानधनार्थ नृपा जसे हरिस मुक्तिनिमित्तक हे तसे.
जरि न मुक्तिनिमित्तहि सेविती, तरि किमर्थ उपास्य रमापती ?
जगिं वृथाचि न मंदहि वर्तती, वदति शास्त्रविशारद ये रिती.

प्रयोजनावांचुनि मूर्ख तेही प्रवर्तती न त्रिजगांत देही;
शास्त्रज्ञ होवूनि वृथा हरीला कां सेवितां ? हें समजोनि बोला.

म्हणाल आतां गुण गोड भारी याकारणें आवडतो मुरारी,
सुधा बहू गोड सुरेंद्रलोकीं ऐकोनि तीतें न भजाचि कां कीं ?
स्वभक्ता न जाणे सुधा आणि कांहीं कृपाळू हरीसारखी होत नाहीं.
असें बोलती तें तयाला पुसावें कृपा घेवुनी काय सांगा करावें ?
कोण्या प्रकारें निजदुःख नाशी नासूनि दुःखा करि सौख्यराशी,
या कारणें तो प्रिय देव जेव्हां स्वप्रीति देवाहुनि थोर तेव्हां.

निजसुखार्थ हरी प्रिय जेधवां, अधिक आपुलि आवडि तेधवां,
हरिहुनी प्रिय आणिकही असी निगमसंमतभक्ति घडे कसी ?

मैत्रेयीप्रति याज्ञवल्क्य निगमीं विस्तार हा बोलिला,
कीं ज्यालागिं समस्तही प्रिय असा आत्माच हा आपला;
जो कां आवडतो निमित्त नसतां तो जाणसी तेधवां
कांहींही तुज जाणणेंचि न उरे सर्वज्ञ तूं तेधवां.
जें जें लौकिकसौख्य वैदिकहि जें ज्या आपणाकारणें
वाटे आवडतें तसा प्रियतम स्वात्माचि जो आपणे;

ज्याची आवडि निर्निमित्त हरिही ज्याकारणें आवडे
तोचि श्रीहरिसा कळे तरिच हे सद्भक्ति ठायीं पडे.
आत्मा सर्वजडप्रकाशक असें लोकीं बहू जाणती,
जाणोनि श्रुतकीर्तनादि सगुणप्रेमा मनीं नेणती;
कोण्ही ते सगुणींच निष्ठ परि हा आत्माप्रियश्रीहरी,
ऐसें भक्तिरहस्य नेणति न हे सद्भक्ति दोही परी.

म्हणतसे श्रुति कीं पशुतुल्य तो इतर मानुनियां हरि सेवितो,
म्हणुनि आत्मपणें हरि सेवणें परमवैष्णव तो तरि बोलणें.
श्रुत्यर्थ तो स्पष्टचि दीसताहे, न भेद हा वैष्णवधर्म साहे;
ऐक्येंचि जें कां भजणें हरीचें तेथेंचि हें भागवतत्व साचें.

गुरुमुखें कळली स्वचिदात्मता तदुपरांतिक जो गुरु देवता
उभयभक्ति निजात्मपणें करी, सकळ होय कृपा गुरुची तरी.
ऐसेंचि बोले श्रुति ' यस्य देवे ' म्हणूनियां अर्थ इचे पहावे.
धरुनि येथें स्फुट या श्रुतीतें यथामति व्याकरिजेल तीतें.
श्रुत्यर्थ कीं ' तत्वमसी ' ति वाक्यें देवीं जसी भक्ति निजात्मऐक्यें;
जैसीच देवीं गुरुभक्ति जेव्हां तैसी करी सिद्धि तयासि तेव्हां.
आत्मनात्मविवेकमात्र गुरुच्या तेव्हां कृपेनें कळे,
जीवेशैक्यउपाधितें निरसितां शिष्यास तें आकळे;
देवीं आत्मगत प्रियत्व उमजे तैसें गुरूचे स्थळीं
ऐसी भक्ति करील चित्तलहरी तेव्हां मुरे चिज्जळीं.

चित्ताची लहरी चिदंबुधिजळीं त्याची मुरे जेधवां,
चैतन्यास जडांत तंतुवसनीं देखे असें तेधवां;
ज्ञानाचा परिपाक होय, परि हें सर्वात्मभावीं जयीं
भक्ति श्रीगुरुदेवपादकमळीं याची टसावे तयीं.

सहज आवडिजे निजिचा निजीं जितुकि भक्ति मुकुंदपदांबुजीं,
श्रवण कीर्तन आवडिनें असा न करि वैष्णव तोंवरि तो कसा.
गुरुमुखें कळल्यावरि आत्मता सगुणभक्ति निरर्थक तत्वता,
म्हणति वैष्णव तेहि न सर्वथा वदति अद्वयशास्त्र वृथा कथा.

श्रवण कीर्तन भक्ति न जोंवरी मनन तों सगुणीं स्थिरता धरी,
निजचिदात्मकता कळली जरी न हरिभक्तिविणें स्थिरता तरी.
म्हणुनियां म्हणते श्रुति कीं जयीं गुरुरमापतिभक्ति घडे तयीं,
गुरुवरें कथिलें निगमार्थ ते अनुभवी करिताति कृतार्थते.

सहज आत्मपणें हरि आवडे सगुणभक्ति तयावरि हे घडे,
अनुभव स्थिर होय तया नरा तरिच केवळ वैष्णव तो खरा.
म्हणुनि वैष्णव दुर्लभ या जगीं इतर वैष्णवता मिरवे उगी,
म्हणुनि वैष्णवधर्महि धर्म हा आकळतत्त्व तयासि वदे पहा.

बाराजणांसि हरिभक्तिरहस्य ठावें ब्रह्मादि ते कथियले यमधर्मदेवें,
ते थोर सिद्ध इतरां अधिकार तेथें नाहीं म्हणाल तरि धर्म वदेल येथें.

मनुष्यलोकांत मनुष्यलोकीं मनुष्यमात्रासहि धर्म हा कीं,
श्रीवासुदेवीं निजभक्तियोगें आत्मत्वभावें भजणें असंगें.

हा भक्तियोग घडणार कसा मनुष्यां ? बोलेल तो यम उपाय तयां स्वशिष्यां.
श्लोकांत या चरणिं शेवटिल्याच पाहा भक्तीस साधन उपाय वदेल जो हा.

हरिगुणश्रवणें हरि आवडे भजन त्यावरि आवडिनें घडे,
परि न पातकि या श्रवणीं रिती परमसाधन नाम असे रिती.
कोण्या मिसें ये हरिनाम वाचे, जळोनि जाती अतिदोष त्याचे.
घे चित्त जेव्हां श्रवणादि गोडी गोडी हरीची मग त्या न सोडी.

श्रोते हो ! यमधर्म वाक्य वदला हें सूक्ष्मदृष्टीं पहा
कीं नामग्रहणादिकीं करूनियां सद्भक्तिचा योग हा.
तेंही कीर्तन हें नव्हे ग्रहण तें जें कां मुखीं उच्चरे
श्रीमन्नाम तसें करी ग्रहण तें पापाब्धि जेणें तरे.

कोण्या मिसेंही हरिनाम वाचे येईल भाग्येंचि करूनि याचे,
श्रद्धा तया ऊपरि कीर्तनाची ते तों कृपा श्रीमधुसूदनाची.

जेथें निदर्शन अजामिळ पुत्रनांवें 'नारायणा !' म्हणुनिही म्हणतां स्वभावें
झालाचि मुक्त, म्हणऊनि यम स्वदूतां श्लोकद्वयेंकरूनि हेंच वदेल आतां.

उच्चारमात्रेंचि अजामिळाला प्रसन्न नामें जगदीश झाला.
हा एक पद्यें महिमा स्वदूतां बोलेल आधीं यमधर्म आतां.

मुखीं नाम तन्नामकाच्याच भावें असें कीर्तन श्रीपतीचें म्हणावें,
म्हणे नाम जाणोनि तन्नामकाला न जाणोनि तो नामउच्चार झाला.

नामोच्चारण विप्र मात्र करितां कैसा पहा सूटला,
जो दुर्भेद्य कृतांतपाश तुमचा तोही कसा तूटला ?
नामोच्चारमहत्वधर्म वदतां प्रेमा मंनीं दाटला
दूतांला यम 'पुत्र हो ?' म्हणतसे, स्नेहाब्धि तो लोटला.

'पहा नवल पुत्र हो !' यम म्हणे स्वदूतां कसें
नजाणतहि ये मुखा सहज नाम तेंही असें,
अजामिळहि सूटला इतुकियाचमात्रें त्वरें
म्हणुनि हरिभक्तिचीं प्रथम साधनें हीं अरे ?

सहज नामहि नाशक पातकां स्मरण कीर्तनरूप तयासि कां ?
परम भक्ति रमापतिकीर्तनें प्रथम यास्तव नामाचि साधनें.
बोलेल ऐसें यमधर्म आतां नामप्रतापासि तयां स्वदूतां
तीं आयका हो ! वचनें विचित्रें पीयूषरूपें निजकर्णपात्रें.

म्हणे यम तयांप्रती अघ हरावयाकारणें
समर्थ हरिकीर्तनें म्हणूनि काय हें बोलणें ?
उगेंचि म्हणतां मुखें निजसुतासि नारायणा
पहा परम मुक्तिही कसि अजामिळा ब्राम्हणा.

जळति अग्निकणेंचि तृणें जरी तरि तयां प्रबळानळ कां परी ?
भलतसें हरिनाम अघें हरी श्रवणकीर्तन कां तरि त्यावरी ?

चित्तीं नाम म्हणे स्मरे स्वहृदयीं तें नाम ज्याचें तया,
ऐसा तो जप आणि उच्च म्हणणें तें नाम जाणोनियां;
तें संकीर्तन आणि नाम म्हणणें नेणोनि तन्नामका
तो उच्चार अजामिळासि फळला कैसा पहा कौतुका.

'नारायणा!' म्हणुनि केवळ आत्मजाला आक्रोशतां द्विज अजामिळ मुक्त झाला.
त्यालागिं काय म्हणणें अघमात्र नाशी संकीर्तनें जिहिंकरूनि सुखांबुराशी.
अजर अमर होती ज्या सुधेच्याच पानें, प्रथम सहज नाशे क्षुतृषादैन्य त्यानें,
क्षुधित तृषित मानी लाभ तो तोचि भारी अघहर फळ नामीं वर्णिती या प्रकारीं.

नामद्रमीं फळ चतुर्विध मुक्ति जेथें तें पापताप हरणें तरि पुण्य तेथें,
जें वीरसैन्य भुवनत्रयराज्य साधी मार्गीं तृणें रगडिती चरणेंचि आधीं.

चरण तिसरा

( श्लोक )

आत्मा हरि प्रिय असें समजोनि वाचे, गाती गुण श्रवणिं आइकती तयाचे,
ते भक्त दुर्लभ तरी अधिकार तेथें सर्वां म्हणूनि वदला यमधर्म येथें.
सर्वांस भक्ति अधिकार जया प्रकारें तोही उपाय वदला यम या विचारें;
कीं साधन प्रथम माधवनाम घेणें नाशूनि पाप भजनीं रुचि होय तेणें.
त्याहीमधें न कळतांचि जरी स्वभावें येती मुखा हरिति पातक विष्णुनांवें;
याकारणें स्मरणकीर्तनरूप नामें तीं मुक्तिहूनि अधिकें सुखपूर्णकामें.
म्हणूनि निर्णय वर्णियला यमें वदति जो मुनि हो ! निगमागमें,
परि न जाणति कर्मठ धर्म हा म्हणतसे यमधर्मचि तें पहा.
ह्मणाल नामीं जरि मुक्ति होते कां कर्ममात्रीं रत शास्त्रवेत्ते,
ते मोहिले वैदिक काम्यकर्में बोलेल ऐसीं यमधर्म वर्मे.
यम म्हणे निगमागम जाणती जन तयांसी महाजन बोलती,
परी तयांसि रहस्य न ठाऊकें करिति कर्म मखादिक कौतुकें.
विरळ त्यांत रहस्य विचारुनी तरति हे हरिच्या गुणकीर्तनीं,
परि अहो बहुतेक न जाणती मृगजळांत बुडोनिहि राहती.
यज्ञादिकीं करुनि होईल चित्तशुद्धी ज्ञानेंकरुनि तदनंतर मोक्षसद्धी;
या कारणें निगम बोलति यज्ञदीक्षा हे स्वर्गमात्रगमनीं धरिती अपेक्षा.
स्वर्गादिकाम करिती विविधां मखांसी ते तों न पावति निजात्ममहासुखासी,
कोशिंबिरी करुनि भक्षिति पुष्पमात्रें त्यांला फळें मग न त्यां तरुचीं विचित्रें.
यज्ञादिवृक्ष फळ मोक्ष तयांसि येती स्वर्गादिरूप सुमनें जन तींच घेती,
सर्वज्ञ जे करिती त्या सुमनीं उपेक्षा होवूनि तींच सुमनें फळ देति मोक्षा.
फुलें भक्षितो तो फळें केंवि लाधे ? मनीं स्वर्ग कैसा तया मोक्ष साधे ?
मनीं कामना ते न तों चित्तशुद्धी, अशुद्धां तयां केंवि कैवल्यसिद्धी ?

स्वहित केवळ ते न अपेक्षिती तरिच ते हरिभक्ति उपेक्षिती
त्यजुनियां अमरां अमरावतीप्रतिहि जावुनि दुःखचि भोगिती.
जसा भाडियाचा तट्टू स्वर्ग तैसा तयाचा अहो ! मानिती लाभ कैसा ?
सरे पुण्य लोटूनियां देति जेव्हां रडे फुंदफुंदों पडे मूळ तेव्हां.
धरुनी भुजीं कंठ देवांगनाचे विमानीं वनीं नंदनीं तेथ नाचे
भुजें त्याच त्यांचे गळे ते धरुनी रडे त्यांस टाकूनि जातां म्हणूनी.
पुण्यास पाप म्हणती अतएव योगी आद्यंत पापफळ यद्यहि पुण्य भोगी,
लोखंडरूप जसि पातककर्म बेडी बेडी सुवर्णमय हे तरि काय गोडी.
स्वर्गादि पुण्यफळ इच्छुनि दीर्घकामी झाले महाजन पराङ्मुख विष्णुधामीं,
लोकांस गोड उपदेशहि हाचि वाटे अंधासवें फिरति अंध जसे कुवाटे.
स्वर्गादि मात्र वदती फळ वेद जेव्हां आद्यंतवंत फलदायक मात्र तेव्हां,
राज्यादि लाभकर लौकिक यत्न जैसे स्वर्गादि लाभपर वैदिक यज्ञ तैसे.
वेदीं चातुर्मास्ययाजी तयाचें आहे कीं जें पुण्य अक्षय्य साचें,
नेणोनीयां अर्थ ते त्या श्रुतीचा वाखाणीती भाव जैसा मतीचा.
म्हणति अमर देवां नश्वरांलागि जैसें,
ऋतुफळ वदती हे वेद अक्षय्य तैसें,
अमरहि मरणातें पावती दीर्घकाळें
क्षय बहु दिवसांतें अक्षयें कर्ममूळें.
वदति शाश्वत मुक्ति फळें श्रुती तरि तदर्थ किमर्थ न ये रिती,
म्हणुनि येथ असें जरि बोलती तरि वदों प्रतिउत्तर त्यांप्रती.
नव्हति शाश्वत मुक्तिफळें तरी श्रुति पुराण असें असतें जरी
नव्हति शाश्वत कर्ममयें फळें म्हणुनि बोलतसे श्रुति या बळें.
नाना कर्म करुनियां क्षितितळीं राज्यादि संपादिती,
तैसा स्वर्गहि यज्ञपुण्यविविधा कर्मींच कीं पावती;
जैशा या इहलोक राज्यपदव्या कर्मार्जिता नासती,
तैसीं तीं परलोकदैविक पदें बोले असें हें श्रुती.
आतां चातुर्मास्ययज्ञादिपुण्यें अक्षय्यें तीं केंवि बोला अगण्यें ?
तेव्हां ऐसा अर्थ अक्षय्यशब्दें कीं ते पुण्यें राहती फार अब्दें.

म्हणूनि देवां अमरत्व जैसें, नित्यत्व या कर्मफळासि तैसें,
कोण्ही श्रुति ज्ञानफळासि तैसा न बोलती नाश तयांत ऐसा.
याकारणें मुक्तिसि नाश नाहीं, न नित्यता कर्मफळासि कांहीं,
सांडूनियां मोक्ष अशा फळाला बोलेल कां वेदजनास बोला.
स्वर्गकामसुतकामजनाला यज्ञ कां वदतसे श्रुति बोला,
पूर्वपक्ष करिताति असाही वेदतत्व तरि ठावुक नाहीं.

नयनिं दावुनि लड्डुकशर्करा जननि दे कडु औषध लेंकरा;
न फळ साखर औषधिचें जसें श्रुति वदे फळ काम्य जगीं असें.
करुनि वैदिक कर्म जसें तसें म्हणुनि वेद फळें वदती असें,
तदपिही न विरक्त जनाप्रती फळ अपेक्षित त्यांसचि मागती.

स्वर्गाचीही कामना ज्या नराला ज्योतिष्टोमा तो यजू कां सुराला ?
ऐसा अर्थ स्पष्ट पाहा श्रुतींत ‘ ज्योतिष्टोम स्वर्गकामो यजेत. ’
श्रवणकीर्तनही वदती श्रुती, परि न तुच्छ फल श्रुति बोलती,
म्हणति वैष्णवधर्म धरा अरे ! त्रिभुवनेश्वरकर्म पहा बरें.
ऋग्वेदिंची ‘ त्रीणि पदा ’ म्हणूनी हे गर्जताहे श्रुति विश्वकानीं;
कीं विष्णूचे धर्म धरूनि राहा ऐकोनि तत्कर्म मनांत पाहा.

गोशब्दें जड बुद्धि इंद्रिय तयां जे पाळिती गोप ते
हे गोपाळ म्हणूनि हे श्रुति तया संबोधुनी बोलते.
कीं हें आक्रमिलें पदें करुनियां त्रैलोक्य याकारणें
त्याचे धर्म धरूनि कर्महि पहा कर्मासि जें पारणें.

‘कर्माणि पश्यति’ म्हणे श्रुति विष्णुकर्मे पाहा मनीं श्रवणकीर्तनरूपधर्मे,
संध्या जसी श्रुति वदे विधि येथही हा ‘कर्माणि पश्यति’म्हणे हरिकर्म पाहा.
स्वर्गादिकाम नर ते कमळापतीची सेवा करून असि उक्ति कधीं श्रुतीची,
येथें उग्याच म्हणती हरिकर्म पाहा त्या विष्णुचे परम धर्म धरूनि राहा.
ऐसा विवेक न कळोनि मुकुंदनामीं श्रद्धा न ते धरिति वैदिक लोककामी,
स्वर्गासि जातिल कदाचित ते तथापि जाती अधोगतिस होवुनि तेचि पापी.

नहुष इंद्रपदाप्रति जाऊनि त्रिभुवनेश्वर इंद्रहि होवुनी
भुजग होउनि तो पडला जसा वरकडांसहि शेवट तो असा.

स्वर्गासि जावुनिहि मागुति जन्म पावे दुर्वासनेकरुनि पापपथींच धांवे
तेव्हां तयावरि कृतांत करी चपेटा, हा काम्य वेदपथ याकरितांच खोटा.
यालागिं केवळ फळात्मक वेदवाचा, जैसी लता फुलति हाचि विचार तीचा;
पुष्पें उपेक्षिति तयां फळ लाभ देती, दूतांसि येथ वदला यम येचि रीती.

पढतमूढ धरूनि अशा श्रुती फुलचि तें फळ मानुनि मोहती;
म्हणुनि नेणति वैष्णवधर्म ते, करिति तुच्छ फळात्मक कर्म ते.
या अध्यायीं श्लोक तो बाविसावा व्यासें केला साधकांचा विसांवा,
तेथें दूतां धर्म जें बोलियेला, या तीं श्लोकीं अर्थ तो सिद्ध केला.

'तन्नामस्मरणें तदर्द्वयपणें त्याची कळे आवडी,
तन्नामें सुटला अजामिळ तुम्हां हे साक्षि तों रोकडी;
ऐसे धर्म न कर्मठांस कळती,' एवं स्वदूतांप्रती
धर्में सांगितली, पुढें वदतसे सद्वैष्णवांची रिती.

ऐसें बरें दृढ विचारुनि दीर्घबुद्धी टाकूनियां सकळ वैदिककाम्यसिद्धी
सर्वात्मभाव धरिती मग ते अनंतीं नामेंचि भक्ति असि साधिलि सर्व संतीं.
'माझें नसे' यम म्हणे 'भय एक त्याला कीं विष्णुभक्तिनिधि सांपडला जयाला.'
स्वर्गास जावुनिहि कर्मठ जन्म घेती, पापें असे नरक मागुति त्यांस होती.
ऐसा मनीं धरूनि भाव कृतांत आतां श्लोकोत्तरार्थ वदतो यम त्या स्वदूतां,
कीं, 'दंडयोग्य नव्हती हरिदास माझे त्यांचे शिरीं कधिं पडेल न दंड ओझें.
पाप्यास दंड करणें मदधीन येथें नामानळें सकळ पातक भस्म तेथें,
त्याला प्रवृत्तिच कधीं न घडेल पापीं तेंही नुरे जरि घडेल कधीं तथापि.'

वैकुंठदूतां यमधर्मदूतां परस्परें ये रिति वाद होतां,
अजामिळाला उपदेश व्हावा, दुःसंग त्यानें अवघा त्यजावा.
संकल्प ऐसा हरिनेंचि केला याकारणें वाद तयांसि झाला.

जीवंत ते यास्तव दूत गेले, श्रीविष्णुशस्त्रेंकरिं ते न मेले.
जरि असें हरिच्या नसतें मनीं, परतते यमदूत न तेथुनी;
वदति नाम तयां हरिआयुधें सतत रक्षिति होवुनि सावधें.
म्हणुनियां श्रीहरिभक्ति जेथें, झणीं तुम्ही नेणत जाल तेथें;
येणें रितीनें यमधर्म आतां हितोपदेशें वदतो स्वदूतां.

जें साधु विष्णुमय पाहति सर्व सृष्टी, ज्यांच्या सदा वदति देव पवित्र गोष्टी,
ते वासुदेवशरणागत भक्त जेथें त्यांच्या झणीं जवळि जाल कदापि तेथें.

यम म्हणे, 'यमकिंकर हो! सदा हरिजनासि रमापतिची गदा
करि सुरक्षण, काय तयां भयें? न करवे मज दंड तयां स्वयें.
हरिजनास पहाल तुम्ही जरी, करिल मृत्यु गदा हरिची तरी,
विहित दंड धरा इतरा नरीं,' म्हणुनियां यम वर्णिल यावरी.

चरण चवथा.

(श्लोक.)

दूतांला वदला कृतांत, 'हरिचीं नामें जयांच्या मुखीं
त्यांला दंड न मी न थोर अथवा कोणी करी आणखी.'
जातां धर्म तयांसि सांगत असे कीं, 'जे तयां वेगळे
ते आणा नरकाप्रती तुम्हि अरे! बांधोनि त्यांचे गळे.'
'आजन्म जो विमुख विष्णुपदारविंदीं सेवी न कीर्तिमकरंद कधीं न वंदी,
ऐसे जगीं बहुत ते नरकार्ह जाणा,' दूतां म्हणे यम 'तयां नरकास आणा.'
'जे कां विरक्त हरिभक्त तदंघ्रिधूळी ज्यांच्या घरीं न पडल्या असती त्रिकाळीं,
ऐशा गृहीं नरकमार्गमयीच तृष्णा,' दूतां म्हणे यम 'तयां नरकासि आणा'.
जिव्हा कधीं न भगवद्गुणनाम वर्णी, चिंती न, तत्पदकथा न कदापि कर्णी,
नाहीं कदापि नमिला जिहिं देवराणा, दूतां म्हणे यम 'तयां नरकासि आणा'.
श्रवण कीर्तन माधववंदनें जळति पूर्विल पापहि काननें,
विधिकरांप्रति यास्तव ये रिती वदतसे यम संयमनीपती.
श्रोते येथें वदति, जळती सर्वही पूर्वपापें,
जाणों नेणों परि अघहरें विष्णुनामें प्रतापें.
पूर्वी शुद्धी द्विविध कथिल्या त्यांत अत्यंत शुद्धी
नाहीं जों तों न घडति कशा मागुती पापवृद्धी?
वंदी, सेवी, 'हरि हरि' म्हणे जीव तो एकदाही,
त्याला कैसा यम म्हणतसे यातनादुःख नाहीं?

पापीं धांवे जरि मन पुन्हां यातनेयोग्य झाला,
ऐसे जे कां वदति वदतो ग्रंथकर्ता तयाला.
धाडील दूतां यमधर्म जेव्हां, आणावया जातिल दूत तेव्हां;
या मृत्युकाळीं जरि नाम वाचे ये, यातनालोक तयांस कैचे ?
'आणूं नका' म्हणतसे यम याचि भावें, जें आणणें मरणकाळचि तो स्वभावें
जेव्हां घडे स्मरण वंदन मात्र कांहीं तो यातनार्ह सहसा जन होत नाहीं.
ज्याचे घरीं न हरिभक्तपदाब्जधूळी तृष्णा जयास सदनांत असे त्रिकाळीं,
'आणा तयास' म्हणतो यम कीं जयाला संतप्रसाद हरिभक्ति घडे न त्याला.
येथें न यास्तवहि आणिक शास्त्रनीती मिथ्या फळश्रुति मुनींद्र मुखासि येती,
शास्त्रांत या सकळ निष्कपटार्थ जेथें मिथ्या फळश्रुति कशा वदतील एथें ?
ऐसें अजामिळमुखीं हरिनाम अंतीं येतां त्वरेंकरुनि सोडविलाच संतीं;
प्राणप्रयाणसमयीं हरिदास्य कांहीं होतांचि शुद्धि, मग दंड तयासि नाहीं.
याहीवरी यम म्हणे निजकिंकराला कीं, 'नेणतां झणिं पहाल अशा नरांला
ते तों बळेंच सुटतील, परंतु तेथें मी सापराध तुमचा अपराध जेथें.'
धरूनी असा भाव पोटीं अनंता स्मरोनी मनीं प्रार्थितो धर्म आतां,
मुखीं नाम जो घे तयाला स्वदूतीं कसें बांधलें हाचि संताप चित्तीं.
हृदयीं आठवुनी पुरुषोत्तम यम म्हणे, 'अपराध करीं क्षमा.'
द्विजमुखीं तव नाम तयावरी उचालिले कर या यमकिंकरीं.
महदतिक्रम हा रचिला हरी ! न कळतां तव किंकरकिंकरीं;
विनवितों कर जोडुनि ईश्वरा ! करिं दया करुणामृतसागरा !
अत्यंत शुद्धि हरिकीर्तनभक्तिभावें, हें तों खरें परि न जाणतही स्वभावें;
नारायणस्मरणकीर्तन मात्र कांहीं ज्याला घडेल मग पातक त्यास नाहीं.
प्राणप्रयाणसमयीं यमदूत जेव्हां येती, घडे किमपिही हरिदास्य तेव्हां;
आजन्म पातक जळे मग त्या पवित्रा होतील दुर्गति कशा विविधा विचित्रा ?
याकारणें प्रकरणार्थ समस्त आतां श्रीव्यासपुत्र वदतो सुखकारसंतां;
ज्या वर्णिल्या विविध शुद्धिहि विष्णुदूतीं नामप्रताप शुक वर्णिल तोचि अंतीं.
बोले श्रीशुक कीं, 'नृपा ! धरि मनीं या पूर्विल्या कौतुका,
तस्मात् कारण विष्णुकीर्तन असें निर्दाळितें पातका,

पापें जीं बहु थोर थोर नरकप्राप्तीच ज्यांचीं फळें
प्रायश्चित्त तयांसही परम हें नामें जगन्मंगळें.

पापास तों भलतशा हरिनाम जाळी, त्याचेंच कीर्तन घडे जरी सर्वकाळीं
पापीं प्रवृत्तिच नव्हे अतिशुद्धचित्ता; श्लोकद्वयेंकरुनि वर्णिल हेंचि आतां.

नामोच्चारणमात्र ज्यांस घडलें ते पावले सद्गती,
सामर्थ्ये हरिचीं अशीं घडिघडी जे वर्णिती ऐकती
त्यांला जे उपजेल भक्ति हरिची अत्यंत ते शुद्धता,
तैसीं तीर्थतपोव्रतें न करिती हें जाण तूं सुव्रता !

अजितभक्ति मनीं उपजे जया मग अपेक्षित काय नृपा ! तया ?
अजितकीर्तनशुद्धि असी बरी म्हणुनियां शुक वर्णिल यावरी.

कृष्णाची पदपद्मचित्सुखसुधा सप्रेम जे चाखती
ते मिथ्या मृगनीरमायिकगुणीं कां हो पुन्हां माखती ?
प्रायश्चित तदन्यही अघ हरी शुद्धी तरी त्या तशा
कीं हस्ती धुतला तथापिहि धुळी तीरीं शिरीं घे तशा. '

शुकमुखें इतिहास नृपें असा हृदयिं आइकतां बसला ठसा;
परम विज्वर या मुनिउत्तरें नृपति होउनि मानियलें खरें.

नरकनाशक नाम नरेश्वरें शुकमुखें हरिचें अतिआदरें
परिसतां अतिविस्मित मानसीं मन बुडे हरिनामसुधारसीं.

बहु सुखी बहु विस्मित भूपती नयनिं देखुनियां शुक त्याप्रती,
वदतसे, ' तुज विस्मय यापरी नवल मानियलें यमकिंकरीं. '

बोले श्रीशुक कीं, ' नृपा ! स्वपतिची ऐकोनि हे वैखरी
दूतीं विस्मित होवुनी धरियली आज्ञा शिरीं हे खरी;
आतां ते तइंपासुनी हरिजना दृष्टीं पहातां मिती,
जेथें श्रीहरिकीर्तनें चुकवुनी तो ठाव ते भोंवती.

अगस्तिनें हेचि कथा शुकाला सांगीतली, जे शुक बोलियेला;
तथापि हें व्यासमुखें पुराणीं भविष्य बोले मुनिवर्यवाणी.

स्वपुत्र सांगेल पुढें स्वशिष्या नृपा असें वर्णियलें भविष्या,
तें बोलतां श्रीशुकही नृपाला कीं, ' हे अगस्ती मज बोलियेला. '
शुक म्हणे फिरतां क्षितिमंडळीं सदितिहास असा मलयाचळीं
मज वदे असतां हरिपूजनीं अतिदयाळु अगस्ति महामुनी.
तृतीय अध्याय विचित्र येथें संपूर्ण झाला इतिहास जेथें,
समर्पिला श्रीहरिपादपद्मीं पद्मालयेच्या अतिदिव्यसद्मीं.
ऐसा ' नामसुधा ' म्हणोनि रचिला श्रीवल्लभें ग्रंथ हा,
सर्वात्मा हरि वामनाननमिसें जें बोलिला तें पहा.
' जे हा वर्णिति, आयकोनि धरिती भावार्थ, त्या सज्जनां
होती भागवती गती कलियुगीं, नामें जसी वामना. '

# वेणुसुधा

क्र. ८७३८

## प्रसंग पहिला

मधुरवेणुरवें मन मोहरी—मधुवनीं मधुशत्रु नमो हरी
करुनि वंदन तत्पदसारसा—कथिन वेणुसुधारस आरसा.

वनीं वाजवी वेणु जेव्हां मुरारी,—व्रजीं चित्त कामें स्त्रियांचें थरारी,
तया वर्णिती प्राण ठेऊनि कंठीं—वधूवृंद तो संकटें दीन कंठी.

अंग वक्र अधरीं धरि पावा,—गोपवेश हरि तोचि जपावा,
वामबाहुवरि गालहि डावा,—तो ठसा स्वहृदयांत पडावा.

वेणु जेविं अधरीं स्वररंध्रीं—अंगुली स्मरति गोपपुरंध्री,
कोमळा सुचपळा अतिलंबा—सतही स्वररसा अविलंबा.

ऐसिये हरिचिये मुरलीनें,—कामतत्पर मनें स्मरलीनें,
मोहिलीं सहवधूत्रिदशांचीं—आमुचीं न नवलें सुदशांचीं.

गायनीं अमर जे अभिमानी—आणि देवललना स्वविमानीं,
त्या स्त्रियांसहित दैत्यजनारी—मोहिलें म्हणति या व्रजनारी.

वेणुध्वनी तो सुरगायकांनीं—त्यांच्या विमानांतहि बायकांनीं,
आश्चर्य कानीं पडतांचि केलें,—न तृप्त ज्यांचें मन हें भुकेलें.

स्मरशरें विकळा सुरकामिनी—गलितनीविहि नेणाति भामिनी,
हरिस देखुनि त्या, अधरामृता—त्वरित इच्छिति, त्याविण ज्या मृता.

कितीकी अशा बोलती गोपदारा,—दुज्या गोपिका वर्णिती त्या उदारा,
महाथोर आश्चर्य हें आयका या—असें प्रार्थिती आणखी बायका या.

आयका नवल हें अबलाहो ! कीं स्थिरा घनिं विजा प्रबळा हो !
हार येरिति मुकुंदउरीं वो ! देखतां न उरतीच उरी वो.

वास ज्यांतचि रमारमणीचा–श्याम ऊर वरि हार मणीचा,
वेणुगान समयांत हरी तो,–डोलतां जनमनास हरीतो.
अधरिं वेणु धरी जइं तो हरी–विरहिणी जनचित्तहि मोहरी;
व्रजवधूंस खुणा व्रजराज तो–मुरलिमाजि वदोनि विराजतो.
करूनी वियोगें मुखें दीनवाणी,–बसे तों विनोदें रमाकांतवाणी
अकस्मात त्या वेणुनें कर्णरंध्री–निघे, सौख्य तात्काळ पावे पुरंध्री.
क्षण असें सुख पावति मागती–त्वरित ते अधरामृत मागती.
जसजसा ध्वनि गोड गमे मना,–तसि तसी उपजे स्मरकामना.
मोहती व्रजपशू मृगगाई,–आमुचें नवल काय अगाई ?
स्तब्ध होति लिखितें जसिं चित्रें,–वेणुच्या ध्वनिरसेंचि विचित्रें.
ज्यांसि न स्मरण हृत्सदनांत–ग्रास वो न गिळिती वदनांत
निद्रितेंचि अथवा लिहिलीं हो !–चित्रींचीं न गमती पाहिली, हो !
मातृस्तनींचा रस आननांत–तों होय वेणूध्वनि काननांत,
गळे गिळेना पय वांसुरांतें,–आश्चर्य वाटें गगनीं सुरांतें.
उचलुनि श्रवण श्रवणामृता–पशु पिती रस जीवन तो मृता,
जवळि दूरहि वृंद असा असे,–मधुवनीं हरि जेथ उभा असे
चरित्रें करी आणखीही हरी तो,–स्वलीलारसें जो अविद्या हरी तो;
स्त्रिया वर्णिती आणखी एक लीला,–तिला आयका नाशितो जे कलीला.
मल्लवेष रचिला अभिराम,–श्रीधरप्रभुसवें बलराम,
मोरपत्रमुकुटीं तरुपत्रें–नेत्र सुंदर जसीं शतपत्रें.
सखे ! असा म्यां हरि देखिला, गे ! तो प्रेमरंगीं मनिं रेखिला गे !
पाचारितो वेणुरवेंचि गाई,–आश्चर्य तेव्हां करितों, अगाई !
गोधनीं बहु पुढें न वजावें,–ठाव एकचि धरुनि थिजावें,
वाजवी म्हणूनि जो निज पांवा,–कृष्ण तोचि हृदयांत जपावा.
पशु जसे ध्वनिनें स्थिर राहती,– तशिं जळें न नद्यांतील वाहती;
व्रजवधू सम होति नया सखे ! सुकृत अल्प विकल्प न यांस ये.
केलीं सुपुण्यें जरि गोपिकांहीं,–झालीं अपूर्णेचि तथापि कांहीं
कां धन्य आम्ही व्रजअंगनांही--तऱ्ही सदा श्रीहरिसंग नाहीं.

भुजा कांपती नित्य आंलिंगनातें,–न फावे तरी सर्वदा अंगनांतें
जगाचा मनीं धाक वाटे जळाला,–अवस्था दिसे हे नद्यांच्या जाळला
हरिप्रेम आम्हां जसें अंतरंगीं,–नद्यांचें तसें दीसतें वो तरंगीं,
भुजा कांपती त्याचि आंलिंगनातें–व्रजीं होय आम्हां जसें अंगनांतें.

आम्हांतही देखुनि कृष्णजीतें–प्रेमे जळें लोचनिं येती जीतें
भयें जनाच्या वरिच्यावरि ते–नेत्रींच नेत्रोदक आवरीते.
नद्यांतही स्तब्ध असेच पाणी,–आम्हां तयांही सम चक्रपाणी,
स्वल्पें सुखें आमुचिया अदृष्टीं–तैशाचि याही दिसताती दृष्टीं.

होऊनि शीतळ सुगंध समीर जातो
कृष्णाकडे तरि पदांबुजिंच्या रजां तो
आणू म्हणूनि उचलूनि भूजा तरंगा
ज्या प्रांथिंती पवन दाउनि अंतरंगा.

कथिति येरिती ज्या व्रजनायका–वदति त्यांस दुज्या व्रजनायका
म्हणति हें परिसा नवल क्षण–त्रिभुवनेश्वर मानवलक्षण.

सुर सरस हरीच्या वर्णिती विक्रमांतें,
अनुचर चरणांचें गाति कीर्तिक्रमातें,
परमपुरुष विष्णु श्रीश हा वाटला, गे !
स्मरत चरित त्याला मुक्तिची वाट लागे.

वनीं हा असे पर्वतीं सर्व गाई,–तईं देखिलीं कौतुकें वो अगाई;
दुरूनि करूनी कृपा चारितो वो,–स्ववंशीरवें त्यांसि पाचारितो वो.
फळें मोक्षकाम्यें, सुखें पुष्पजाती,–असें वेदवेदांत वर्णूनि जाती;
फळें दोनिही विष्णु देणार साचा,–तया दाखवी नाद वंशीरसाचा.

फळें दोनि हीं जे स्थळीं देव दावी,–तनू तेचि साकार त्याची वदावी;
असा विष्णु वृक्षांलतांमाजि पांवा–अहो, दाखवी तो गुरुत्वें जपावा.
स्वशब्देंचि जो व्यापकालागिं दावी, स्वयें विष्णुची मूर्ति तेही वदावी;
फुलांची फळांची पडे वृष्टि भारी लतावृक्षरूपें दिसे कैठभारी.
लतांमाजिं काटे तरुमाजि पानें,–उभे रोम ते वेणुपीयूष पानें;
फळीं आणि पुष्पीं तयीं वृक्षभारी--सुखें त्या दिसे त्यांत तो कैठभारी.

वृक्षां लतांसहि घडे गुरुभाव लोकीं-- कीं विष्णु दाविति जनास कृपावलोकीं,
प्रेमें सुखें करिति विष्णुनिरुपणांतें--श्रेष्ठत्व साधिति लतात्वतरूपणातें.
मुखें वर्षती विष्णुनामामृतातें—सुधा पाजिती मृत्यूलोकीं मृतातें
रसस्राव ऐशापरी गोड भारी; जसा संत शब्दामधें कंठभारी.

---

## प्रसंग दुसरा

दिसे जेधवां जे रितीनें जिला हो ! तसा घेतसे ते मनामाजि लाहो;
कितेकी अशा आणिखी गोपदारा—प्रकारांतरें वर्णिती त्या उदारा.

म्हणे एक म्यां कृष्णजी देखिला गे
असा कीं ललाटी टिळा रेखिला गे !
पहातां पहातां पहावाच वाटे,
रुते चित्त जाऊन नेत्राच वाटे

आपाद माळा प्रभू कृष्णजीची—सुधा पिती षटपद कृष्ण जीची;
प्रदक्षिणा ते अवघे तिला हो ! करुनि गुंजारव घेति लाहो.
गुंजारवें भ्रमर गुंजति त्यांत देवें, वेणुध्वनि मिसळला मृदू वासुदेवें,
आपादकंठ वनमाळ असी विराजे, ते सेविती मधुप होऊनि देवराजे.
वेष हो ! रचिलयें भ्रमरांचें—वृंद ते ऋषिवरांअमरांचे
यामिषें स्तविति भक्ताचि जाणा—सेविती हृदयसाक्षि सुजाणा.
त्यांस आदर करी अधरीं तो,—वेणू येरिती मुकुंद धरीतो,
कीं जया उठति षटपदवाचा—ते रितीं रसहि वेणुरवाचा.
विभव त्या समयांतिल आयका,—नवल कीं खग या व्रजनायका
भजति वेष्टुनियां अति वो ! रसें—सुरस वेणूचियाच अवो ! रसें
वनीं राजहंसीं पिकानीं शुकांनीं—ध्वनी गोड तो आइकोनी सुकांनीं
त्वरें येउनी सेविलें श्रीहरीतें—महापापही नाम ज्याचें हरीतें.
वदन लावुनि ते सकल क्षितीं—नयन झाकुनि अन्य न लक्षिती;
स्थिर मनें करुनी स्थिर आसना—करिति ते खग कृष्णउपासना.

त्या खगीं क्षिति कितेक चावर–व्यापिली प्रभुमधें जिचा वर
भोंवते विहग शोभते धरा,–श्रीपतीसह मनांत तें धरा.
क्रीडें असें आणिक पूतनारी–ते गाति अन्यारत पूत नारीं;
कीं ते वदे तें परिसा सया ! हो–व्या एक चित्तांचि रसास या, हो
दिव्यहार बरवेच तुरे हो !–कृष्ण रामहि असे चतुरे ! हो.

तेधवां गिरितटीं निज पांवा–वाजवी हरि तसाचि जपावा.
स्वयें तुष्ट संतुष्टवी तो जगातें–अगांते नगातें मृगातें खगातें,
असें क्रीडतां काळ माध्यान्ह झाला–घनें देखिलें तों सख्या त्या अजाला.
धरुनि साउलिही वरि हर्षतो,–हळुहळू घन गर्जत वर्षतो,
नवविधा निज भक्तिहि दावितो; समगुणें स्वसखा हरि भावितो.

जगज्जीवन श्रीहरी आणि काळा–करीतो जगीं जीवनाच्या सुकाळा
असो, मेघही या निमित्तें सखा हो; सुहृद्भाव ऐसा नसे आणिकां, हो !
झणी उष्ण लागे सख्या केशवातें–म्हणूनि त्वरें येउनी लेश वातें,
मुकुंदावरी मेघ तो छत्र झाला,–करी स्वात्मदेहार्पण श्रीअजाला.
करुनि सख्य निजात्मनिवेदना–घन भजे पहिले मधुसूदना;
प्रगट दास्यहि त्याच मिषें करी, धरि घण्यावरि साउली लौकरी.

छत्रात्मता अर्पुनियां अजाला–धरुनियां साउलि दास झाला;
करुनिही स्वात्मनिवेदनातें,–दास्यें भजे श्रीपुरुषोत्तमातें.

आणीक भक्तिरस जो शुक सूचवीतो
त्यांच्या क्रमेंच नृप घेत असे चवी तो;
कीं मंदमंद घन गर्जतसे नभीं हो !
शंका धरुनि तरि काय म्हणून भी हो ?
मेघध्वनी मुरलिहूनी विशेष होतो,
तेव्हां घडे महदतिक्रम कीं अहो ! तो.
शंका असी तरि उगा घन कां असे ना ?
हे मंद गर्जननिमित्त असें दिसेना.

नभींहूनि तेव्हां असी गर्जना ही–करी वृष्टि मौन्यें तरी वर्ज नाहीं;
घडी एक वर्षे घडी एक राहे,–उगा कां नसे मेघ टीका करा हे.

श्रवणभक्तिमधें घनराज तो--करुनि किर्तन भाक्ति विराजतो;
स्वमनिं भाव असा शुक नेमुनी–कुशळबुद्धिसी वोढुनि ने मुनी.
हळुहळू घन गर्जतसे नभीं--मुरलिहुनि चढेल म्हणोन भी;
श्रवणभाक्ति अतिक्रम वर्जतो,--करित कीर्तनही घन गर्जतो.
मिळोनि गातां प्रभुवेणुसंगें–झणी चढे गर्जत त्या प्रसंगें;
शंका जरी यावरि हे वदावी–तथापि भाक्तिद्वयभाव दावी.
पुढें होउनी एक जो गाय नाचे, तसे संगतीं गाति त्या गायनाचे;
असा वेणु ऐकूनिही मेघ गातो,–करी एकदां सर्वभक्ती अगा ! तो.

रंतांत एक हरिचे गुण गायनाचे
संगीं तसेच गुण गातिहि गायनाचे,
ते साधिती श्रवण भाक्तिहि गात सारे,
बोले नृपास शुक मेघ अगा ! तसा रे !

वेगळ्या नवहि भक्तिरसांचा–एकदांचि करि आदरसाचा.
कीर्तन श्रवणभक्तिहिमाजी–सूचवी शुक मुनींद्रसमाजीं.

या गर्जिती श्रवणभक्ति नवांचमा जी
श्रीव्यास तत्सुतहि त्या उभयां समाजी
तेथें दिसे स्मरणभक्तिचि सूचना ही,
कीं विस्मृतीस अशि हे पदवीच नाहीं.
गोडी दिल्ही प्रति रसासहि जीवनानें
भक्षूनि ते विविधही जगजीवना ने,
भक्ती स्वयें रिति जिणें स्मृति जीवनानें,
तेही नवांत गणिली जगजीवनानें.
हे सूचली श्रावणभक्तिहि मानवांत,
श्रेष्टत्व दाखवि जिचा महिमा नवांत;
भूमीवरी पडति मेघतुषार कांहीं
तें पादसेवन गमेचि शुकादिकांहीं.

म्हणे मुनी कीं सुमनें करूनी–वर्षे सख्यातें घन त्यावरूनी;
धूतो जलत्वें पद या प्रकारें–केलीं तुषारें सुमनानुकारें.

भूमि हे चरण माधवजीचे–सृष्टिवृष्टिहि पदें भव जीचे;
वर्षतां क्षितीवरी सुमनातें–पादसेवन घडे सुमनातें.

वर्षे तुषार परि ते सुमनें शुकानें
भावें अशा कथियलीं अति कौतुकानें;
ते मूर्तिचे पदहि धुउनि अंबुदानें.
पुष्पांजली मग दिल्ही निज अंबुदानें.

चरणिं तोयद सेवि तसा पडे–निववितां तनु अर्चन सांपडे;
स्नपन देत भजे कुसुमांजुळीं–सुमन शद्विं तसा महिमा जुळी.
नमस्कार सर्वात्मभावें करीती,–तळींही तया देव तो एक रीती.
वरूनी धन स्तब्ध तो वंदनाची–करी भक्ति नंदाचिया नंदनाची.
गीतेंतही अर्जुन वंदनातें–श्रीविश्वरूपा यदुनंदनातें,
मागें पुढेंही करि सव्यसाची–सख्या नमी तो घनही तसाची.
मागें पुढें वंदन तूजपायीं–तूं सर्व वंदू तुज सर्व ठायीं;
अनंत सामर्थ्य पराक्रमी तूं–सर्वांपटीं जाणसि सर्व तंतू.

---

## प्रसंग तिसरा

नवविधा असि भक्ति घना घडे–भ्रमकवाडहि जीस्तव ऊघडे;
भजति आणिक गौळणि बायका–म्हणति अभ्दुत हे तुम्हि आयका.
स्थळीं स्थळीं गौळणि या रितीच्या–कथा करीती कमळापतीच्या;
कोणी यशोदेस समीप होत्या–निरोपिती तीप्रतिही अहो ! त्या.
यशोदे तुझा पुत्र वंशस्वरांनीं–सुधा ओष्ठिंची वर्षतो या स्वरांनीं;
तईं भोंवते मोहती देवजाती–जयांचीं मनें उन्मनत्वास जाती.
कमल संभव आणिक शंकर–त्रिदशनाथ सवें सुरकिंकर,
म्हणति सर्वहि त्यास “ नमो हरी ”–करूनि मोहित जो मनमोहरी.
कीं ताळकीं मंद असें कळेना,–रागस्वराचें घर आकळेना;
रसाचमध्यें अवघे बुडाले,–विचार ज्यांच्या मतिचे उडाले.

भरें रसाच्या अति नम्र माना—मूर्ती अशा सर्वहि वर्तमाना;
सभोवतें येरिती देवजाती—नादामृतामाजि बुडोनि जाती.
टाकून लज्जा स्थिति लोकरीती—वार्ता यशोदेप्रति त्या करीती;
निर्लज्जतेनें व्रजगोपदारा—आणीकही वर्णिति त्या उदारा.
पशुखुरीं बहु खिन्न वसुंधरा,—सुत तुझा अवलोकुनि ते धरा,
अधरिं वेणु धरी, श्रम तो हरी,—वरुष्रतो रस तिस तो हरी.
सुत तुझा क्षितिचें कुशल क्षणें—करि पदें ध्वजअंकुशलक्षणें;
चरण लावुनि वो ! जलजा तसे—गजगती जगतीवरि जातसे.

मुखीं वेणु ऐसा वनामाजि वागे,
गमे सौख्य देतो क्षितीच्या जिवा, गे !
यशोदे असे लावितां तीस पाय,
स्मरें आमुचा थोर केला अपाय.

जो असे रिति वनांत हरी तो—भूमिचा श्रम अशेष हरीतो;
वाजवी मुरली दैत्यजनारी—त्या रसोंचि भुलल्या वज्रनारी.
अशा माजि वो ! चालिलों काननातें—विलासें पहाया मृगांकाननातें.
यशोदे दुरूनीच तूझ्या कुमारें—मनें मोहिलीं व्यापिलीं जैं कुमारें.
तरुस्तब्ध नेणे जशा लोकरीती,—तशा गोपिका भाव तेव्हां करीती;
शिरीं मोकळे केश, वस्त्रें गळालीं; मनें मोहिलीं येरिती वेगळालीं,
दुरुनि हो व्रजनाथनिरीक्षणीं—गलित होउनि जाय निरी क्षणीं;
मन मुरे पवनीं चळतां सरे—शिथिल होउनि अंबर नीसरे.
ऐशाच आणीकहि गोपदारा—लीला हरीच्या वदती उदारा;
कीं मोजितो नंदकुमार गाई—आश्चर्य तेव्हां करि वो ! अगाई !
देव ज्यांस म्हणतात " नमो जी—" तो वनांत हरि गोधन मोजी,
कंधरीं तुळसिहार करीतो,—घेउनी गणित कृष्ण करीतो.

प्रिय अनुचर गौळी धन्य खांदा तयांचा
तदुपरि भुज वो ! या मुक्तिच्या दातयाचा;
धरुनि तुळसिमाळा दूसरा बाहु भारी,
व्रजपशुगण नेला कैटभारी उभारी.

असा गोधनें मोजितो आणि गातो, करीतो सुखी वेणुनादें जगा तो;
अशाही विलासांत आश्चर्य दावी—मृगी मोहिल्या गोष्टि तेही वदावी.
व्रजवधूसम हो हरिणी हरी--करि मनें मुरलीध्वनि जो हरी;
वसति त्या धरुनी प्रभुसंगती—पतिसुतादिसुखांत न रंगती.
वाटे न ज्याला मृगकृष्णनाथ—स्वस्वामि हा मानिति कृष्णनाथ;
या कृष्णजीच्या गृहिणी गणाया—लेखा स्वसाम्यें हरिणी गणा या.

व्रजयुवति गृहाशेपासुनि मुक्ता
फिरति धरुनि चित्तीं जेविं या नित्यमुक्ता;
रुचि तशि न मृगीला या मृगांकाननाची
तनु नयनिं पहाति श्रीमृगांकाननाची.

हरिसमीपिचि केवळ राहती—परिसती मुरली मुख पाहती
व्रजवधूसम पावलि या गती,—मग तसें अरामृत मागती,
यशोदेपुढें आणिखी गोपदारा—अशा वर्णिती कृष्णलीला उदारा;
म्हणे, "निर्मिले दिव्य जे दाम कुंदीं—यशोदे! बहू शोभती ते मुकुंदीं,
हार शोभति गळां व्रजपाळा;—भोंवतां पशुपगोव्रजपाळा;
वेणु गोड अधरीं स्वकरीं तो—कौतुकेंच यमुनेंत करीतो"
म्हणति गौळणि, "वत्स तुझा हरी—व्रजवधूजनचित्त अवो! हरी;
मुरलिमाजि विनोदकळा करी—म्हणतसे सुख देइन लौकरी.
भिउं नका म्हणतो तुम्हि कामिनी—दिवस जाउनि पातलि यामिनी,
करिन जें अति इष्ट तुम्हां असे—करि विनोदहि वेणुमध्यें असे.
असा उभा हो यमुनातटाकीं—विनोद वाणी मुरलींत टाकी,
समीर तेव्हां मलयाद्रिवासी—हळूहळू सेवित माधवासी.
उभे भोंवतें वृंद वृंदारकांचें—गळा हार वो! कुंदमदारकांचे,
असे वेष्टुनी पूजिती सर्व देव—दिसे हा स्वयें त्यांत देवाधिदेव.
असा गोधनाच्या श्रमातें हरीतो—कराया सुखी आमुतेंही हरी तो;
करीती नमस्कार तों वृद्ध वाटे—तयां देखतां दुःख आम्हांस वाटे
गोंविती जठर नंदनंदना—टोणपे पडति आड वंदना;
शाग्र सोडिति तयाशि वाटते,— गोष्टि हे विषसमान वाटते.

त्वरा यावयाची तुझ्या नंदनातें—न मानीच हो इष्ट त्यावंदनातें;
यशोदे ! असें वर्म त्याला कळेना,—मनोभाव वृद्धां तयाआकळेना.
वनीं सेविती वृद्ध पद्मासनादी—व्रजीं चालतां वंदिती तो अनादी;
असा लागतां वेळ येतां उदारा—व्रजीं अंगुळ्या मोडिती गोपदारा.
अशा संकटें पावतां गोकुळातें—सुखें दे समूहा वियोगाकुळा तें;
तयावीण जो रोग नेत्रीं हरी तो—स्वसंदर्शनाच्या सुधेनें हरी तो.
खुरांचा धुळोरा मुखीं आणि हारीं—व्रजीं येतसे कृष्ण ऐशा विहारीं,
दिनांतीं असा धेनुवृंदांत वाटे—शशी देवकीगर्भसंभूत वाटे.
मदविघूर्णित वो नयनांचळ—व्रजवधूवरि ते करि चंचळ;
शशि चकोर—कुळीं सुख देतसे, विविधमान वधूंप्रति दे तसें,
कुंडलें जडित दीप्ति फांकली—दाविती दिनमणीस वांकुली;
धूळिधूषितहि गंडमंडळीं—स्वप्रभा मिरविली सुकुंडलीं.

यदुपति दिवसांतीं येरिती पातला गे
गजपतिगति येतां गोड चित्तांत लागे,
मुदित वदन साजे ये असा चंद्रमा, गे !
सुखकर पण ज्याला व्योमिंचा चंद्र मागे.

स्वगोधनें लक्षित ये हरी तो—दुःखें दिवंतींहुनिही हरीतो;
गाई सुखीं येरितिनें करीतो—देणार आम्हां सुख लौकरी तो.
प्रतिदिनीं दिवसा व्रजनायका—स्मरति येरितिनें व्रजनायका ;
रमति त्याचसवें प्रतियामिनीं—हरिविणा क्षण नेणति कामिनी.

निशा कृष्णध्यानीं प्रियविषयनिष्ठा दिवस तो,
निजे रात्रीं जागा जडजन दिनीं त्या न वसतो ;
हरीचे जे दास क्रमिति हरि गाऊनि दिस ते,
प्रिये रात्रीं ध्याती तरि असिच गोपीस दिसते.

व्रजांत जो जागृत लोक सारा—जों या कथा वर्णिती लोकसारा.
कृष्णांगसंगार्थ निघोनि जाया—या सिद्ध तों ते डुलती निजाया.
अहा ! भाग्यवंता महा गोपदारा—अशा गाति या कृष्णलीला उदारा.
असा बोलिला. श्रीशुकाचार्या राया—कथा या त्रिलोकासही उद्धराया.

वामनाननमिषें वसुधेतें–धन्य कृष्ण करि "वेणुसुधे–" तें ;
वर्णनीय गुण वर्णुनि लोकीं–तो कृतार्थ रस जो अवलोकीं.
करी धन्य गोपाळजी वामनातें–कथाछंद लावूनि त्याच्या मनातें.
महाभाग्य हें अन्यथा काव्यरीती–वृथा ज्या कवी लोकवार्ता करीती.
हरिगुणामृत जींत पदोपदीं–अशिहि "वेणुसुधा" हरिच्या पदीं
रचुनि वंदुनि अर्पुनि वामनें–धरियला हरि नित्य नवा मनें.

---

# वनसुधा

## अध्याय पहिला

सुगति दे अति दुष्ट अघासुरा, –स्मर मना दृढ त्या अनघा सुरा,
प्रभु ऋणी जन्हि दे परमा गती, –स्वपददास्यचि ते नर मागती.

भक्तानिमित्तचि अघासहि मोक्ष झाला,
भक्ताहि देउनिहि मोक्ष अधोक्षजाला
वाटे असेंचि मजला ऋण त्या जनांचें,
भक्तप्रियत्व इतुकें भवभंजनाचें.

भक्तीनिमित्तें वदनीं निघाला, –दिल्हा तरी मोक्षचि त्या अघाला;
तो भाक्तिनें कां स्वमुखीं न घाला ? –पडेल दुःखावरि सद्य घाला.

मारूनि अज्ञान अघासुराला, –स्वानंद दे वत्सप वासुरांला,
स्वनाम घोशे वदनीं हरी तो–निघे, स्वनामें अघ तो हरीतो.

येतां मुखांत अघमूळ अघासुराला, –नासुनि देईल सुखें अनघासुराला ;
वाग्वह्लिकीर्तनभरें सुरराजटाळी–वाजेल, जे सकळ विघ्नसमाज टाळा
गो बुद्धिसंततिच इंद्रियवत्सपाळा जे देव पाळिती तयांसहि वत्सपाळां
पापें अघेंचि गिळिलें तरि, यो हरी तो–तोंडांत कीं अघ अघासुर जो हरीतो.

येथें पहा तुम्हि कथा असि कृष्णजीची
द्वैपायन स्तुति करी मुनि कृष्ण जीची,
सांगे कथा शुकहि तोचि परीक्षितीतें,
जे उद्धरी अजि ! तया उपरी क्षितीतें.
पिउनि सविषही हो ! पूतनेच्या स्तनातें,
मनिं धरि जननीचें श्रीगदाहस्त नातें,
निजपरमपदातें जो स्वधीरां जना दे,

गुणरहित विकुंठीं श्रीमहाराज नांदे.

राक्षसी जरि म्हणो जन नीची,—दे मुकुंद पदवी जननीची,
सद्य ने स्वपरमा सदनातें,—तें खरें करि सुखप्रद नातें.
स्वलोकास ज्या ने हरी पूतनेला,—करूनी तिचा बंधुही पूत नेला.
तयाही बका धाकुटा ये व्रजाला,—तया शोक त्याचा महा तीव्र झाला.

घाली झणी व्रजजनावरि दैत्य घाला,
“ मारूं ” म्हणे हरि “ वनांतचि त्या अघाला;
त्या कारणोंचि वनभोजन हेत केला,
भातादह्यासि न शिळ्या हरि जो भुकेला.

एवं व्रजापति अघासुर दुष्ट यावा,—त्याचा वनांत हरुनी बळगर्व यावा
या लागिं जाय विपिनास, उठे प्रभातें—न स्पष्ट जों बरवि होय रविप्रभा ते.
बोले सुलांप्रति हरी पहिले दिशीं कीं,—रात्रींच सिद्ध करणें अशनादि शिंकीं;
जाऊं समस्तहि उद्यां वनभोजनातें.—पोटांत भाव वधणें अघदुर्जनातें.
एके दिनीं मनिं धरूनि असें हरी तो,—चाले प्रभातसमयीं, खळ जो हरीता;
शृंगीरवेंचि करि जाग्रत मित्र सेना,—देणार जाग्रतिस ज्याविण हो ! असेना.
खडबडोनि समस्तहि धांवले,—सहितवत्स हरीप्रति पावले;
सकळ खेळतिं सोडुनि वासुरां,—परम कौतुक जें गगनीं सुरां.
वनीं खेळती बाळ हे बल्लवांचे,—तुरे खोंविती मस्तकीं पल्लवांचे,
फुलांचे गळां घालिती दिव्य हार,—स्वनाथासवें ते करीती विहार.
स्वकौशल्य ज्या गुंजमाळांत,—नाना गळां घालिती, ते करीती तनाना,
शिरीं बांधिती मोरपत्रें-विचित्रें,—शरीरावरी रेखती दिव्य चित्रें.
नसोनी उणें रत्नमुक्तां सुवर्णा,—उगाळूनियां मृत्तिकावर्ण वर्णा
तनू रेखिती, कृष्ण ही लोकरीती—करी चित्त देहीं, जसे ते करीती.
हरिहि आपण त्यांतचि खेळतो,—ह्मणुनि वर्णितसे शुक खेळ तो.
चहुंकडे करिती नवल क्षिती,—परि हरीसचि सर्वहि लक्षिती.
पहायास शोभा मृगांकाननाची—पुढें स्फूर्ति जातां मृगांकाननाची,
गडी त्या चतुर्वक्त्रबापास हातीं—धरीतीच धांवोनि निष्पाप होती.
धांवोनि लावी पहिलें करातें,—श्रेष्ठत्व दे त्या अजि ! लेंकरातें.

जो तो म्हणे, " लाविन मीच पाणी,–धरीन आधीं प्रभुचक्रपाणी. "
परोपरी खेळति जी ! वनांत– अर्पूनि चित्तें जगजीवनांत
धरूनियां मर्कटपुच्छ हातीं–तयांसवें वृक्षिं उडों पहाती.
मुखें वासुनी लोचनभ्रूतटातें–उभारूनियां वांकुल्या मर्कटांतें,
अहो ! दाविती शब्द तैसे करीती,–असे खेळती बाळ निःशंकरीति.
खगांचिया साउलिच्याच संगें–ते धांवती हास्यरसप्रसंगें,
हंसाचिया दाखविती गतीनें,–जे लाधले हंसगुरूगतीतें.
वनीं देखती मेघनीळास मोर–प्रमोदें करी नृत्यलीला समोर,
तयासारखे नाचती लोक सारे,–खुणावूनि अन्योन्य कीं " तो कसा रे ? "
जसे दांभिक ध्यानमुद्रा धरीती;–जना दाविती ज्ञान ही बोधरीती,
तसी दाविती ते बकाभ्यासमुद्रा–गडी हांसवीती कृपेच्या समुद्रा.

उडत उडत चाले जेंवि मंडूकजाती
उकड बसति तैसे त्यासवें तीव्र जाती,
न बहु परिसतां ते हस्तपादादि पाणी
मरति नवल पाहे हांसतो चक्रपाणी.

नामप्रतापें घनसन्निभाच्या–प्रतिध्वनी देति दिशा नभांच्या,
तों तों बळें गजर्ति तोक सारे,–तुम्ही न गर्जा ध्वनि तो कसा रे !
रमति हांसति हास्यरेंस असे, निजमनोगत ज्यांस जसें असे,
करिच तो वनिं खेळ अहो ! तसे विमळ जे स्मरतां मन होतसे.
वदे शुकाचार्य परीक्षितीतें–कीं " धन्य राया, करिती क्षितीतें
श्रीमूर्ति जें ब्रह्मसुखानुभूती–ती भोंवत्या खेळति त्या विभूति.
संतासि जें ब्रह्म सुखानुभूती–दासांसि तें दैवत सर्वभूतीं
जना दिसे बाळक लोकरीती–क्रीडा तयासीं शिशु ते करीती.
अलभ्य ज्याचा पदरेणु सिद्धां–योगेश्वरांलागुनिही प्रसिद्धां,
प्रत्यक्ष तो शेषहि हो ! स्ववाचा–वर्णू शकेना वज वैभवाचा. "
वदे शुकाचार्य असेचि राया,–कीं "वासरें सोडुनियां चराया
क्रीडा अशा श्रीहरिशीं करीती–अलोकभाग्यें परि लोकरीती.

स्वजनजीवन दैत्यअजीवनी–सगुण तो व्रजराज अजी ! वनीं
रमतसें जरि त्या जगजीवनीं–मन बुडे, न बुडे मृगजीवनीं.
वनचरित्रसुधा व्रजकाननीं–करुनि तें हरि वामनआननीं,
हरिच ओतुनि वैभव देतसे,–अमृतबिंदु हरीच्च वदे तसे.
ग्रंथ हा "वनसुधा" रचला हो–दे सुधेहुनिहि फारच लाहो.
जो वनांत हरि हा रमला हो !–देतसे स्वयशहार मला हो.

---

## अध्याय दुसरा

स्थिरचरात्मक जो अवघा हरी–स्वजनजीवनहेतु अघा हरी;
सुखसुरद्रुम कामदुधा सुरा,–स्मर मना ! वाधं जेविं अघासुरा.
रस पहाति नभीं अवघे सुर,–त्वरित ये इतक्यांत अघासुर.
दुरुनि लक्षितसे खळ खेळ तो–बकबकीरिपु ज्यांसह खेळतो.
त्या मुलांत हरिचा प्रताप तो–देखतां अघ मनींच तापतो.
"हा" म्हणे भगिनिबंधूघातकी–मीच एक उरलों तिघांत कीं.
या मुलांसहित यांस गिळावें,–ते गिळूनि न पुन्हां उगळावे;
दोंनिमित्त न वधीं जरि सारे–क्रोध दारुण शमेल कसा रे !
करुनिया तिल यासह लेंकरें–नरडिच्या रुधिरें सलिलें करें
बरवि देइन आजि तिळांजळी,–करिन तृप्त बकी बक या जळीं"
परंतु हातें जरि हे वधावे, कोणी झणी घेउनि जीव धावें
म्हणोनि पोटींच कलाप सारा,–निधे असा हो ! पसरी पसारा.
ऐसें विचारूनिच राजवाटे–निजे, पहातां गिरिराज वाटे
मोंठा धरी देह भुजंगमाचा–जो नाशकर्ता स्थिरजंगमाचा.

अघ अजगर मोठा तोंड वासूनि वाटे
शयन करि मुलांला तुच्छ होऊनि वाटे,

न फणि परि फणीसा दीसतो हा स्वरूपी
म्हणऊनि शिशुवृंदे स्वैरभावें निरूपी.

म्हणति, "दुष्ट भुजंग असे खरा,–तरि भिऊं न तया खळशेखरा;
सकळ यांत निघों तरि काय हो !–करिल सर्प भयानक काय हो.
निघोनि पाहों घडि एक सारे, गिळील आम्हां खल हा कसा रे ?
शिरावरी श्रीव्रजराज हा कीं–जो मृत्युकाळा सकळांस हाकी."
म्हणती, " एक गिळी जरि साप हा–घडिमधेंची मरेल कसा पहा
चिरुनि टाकी जसाचि बका क्षणें–वधिल यांसि पहा कमळेक्षणें"
जरि असा अजि ! निश्चय सांपडे,–अजित सर्व म्हणोनि ठसा पडे,
अघफणांतहि हार दिसे हरी,–अघबकीबक जो निमिषें हरी.

---

## अध्याय तिसरा

हरिकथा परिसा अति पावनी,–करि पहा कसि त्यांसि कृपा वनीं,
भरवसा धरितां हरिचा हरी–भवभयें न कसा अजि ! संहरी ?
देखोनियां दुःख अघास वाटे,–त्या आंत जावे अवध्यास वाटे;
नामध्वनीयुक्त अवीट टाळी,–ते वाजवीती स्वअरिष्ट टाळी.
गडी सर्व टाळीरवें केशवाचे–असे धांवती श्रीहृषीकेश वाचे,
सवें हांकिले वृंदही वासुरांचे,–भयें कांपले देह सर्वां सुरांचे.
मुखीं सुरांच्या गगनीं अहाहा !–अनर्थ झाला म्हणती "पहा हा,
परंतु रक्षील हरी प्रभावें" झाले उगे मानुनि याच भावें.

पोटीं सवत्स शिशुवृंद जरीं निघाला,
नाहीं तयांत हरि, हें कळलें अघाला;
यावा मुकुंद म्हणऊनिच वाट पाहे,
हे देखता हरिस उद्भवली कृपा हे.
देखोनि मानित अही हरि विस्मयातें
कीं सर्प हा करिल दारुण भस्म यांते,

जाळील लाविल न हा अमुर क्षणातें
यांच्या तरी करिन मी असुरक्षणातें.
निज बळप्रद सर्व खळास मी,–विषमता न सुरां असुरांसमी.
म्हणुनि होतिल दैत्यविषें मृतें–पार तयां उठवीन कृपामृतें.
गृहसुखीं निघणें जरि मज्जना–तरि करीन भवांबुधिमज्जना;
स्वकृतभोग घडेच जरी खरा–तरि न बाधक साधकशेखरा.
गृहरती जरि होति सुखावहा ,–तरि म्हणें. " मज रक्षिल देव हा "
जरि अचूक सुखासुख पावतो. तरि तया बुडवीच न भाव तो.
ऐसे जरी अजगरोदरवन्हिजाळ
हे नाश पावतिल वत्सप वत्सजाळ,
वर्षोनि त्याउपर मी स्वकृपामृतातें."
रक्षीन मारुनि अघासुर या मृतांतें. "
विचारूनि ऐशा कृपेनें हरी तो,–स्वयें जों रिघे जो खळां संहरीतो;
पडे भक्त त्यामाजि घाली स्वदेहा,–जया आपुलें देव सर्वस्व दे हा.
पडे ज्यांत भक्त स्वयें त्यांत टाकी–उडी आणि काढून आणी तटाकीं;
जगीं ख्याति ऐसी कराया हरी तो–निघे त्यांत, जो त्या खळा संहरीतो.
मृत्यु जे घडिस होय अघाला,–प्राण ते क्षणिंच ये अनघाला.
दोनि एकसमयींच कराया–जाय त्यांत म्हणतो शुक राया.
प्रथम उठवितां हे देखति जों भयातें
न जिति निजगडी तों केंवि मारूं तयातें;
करि शरण न रक्षी जों दुजें काम घेना
उभयहि न घडे हें त्यांत जों मी रिघेना.
स्वभक्तांसि जो देव सर्वस्व दे हा,–अघाच्या मुखीं वाढवी जो स्वदेहा
जसा वायु दाटे, तसें दुःख वाटे,–निघे प्राण तो ब्रह्मरंध्राचवाटे.
हरीच्या स्मृतीनें तनुत्याग होतो,–न ये मागुती गर्भवासा अहो ! तो
हरीस्पर्श देहावसानीं अघाला–म्हणोनी न देहांतरीं तो निघाला.
हरिस्पर्श त्याचा अगण्या दिसांचा–करी भस्म हो ! पापपुण्यादि सांचा.
समीरासवें ज्योति त्यांची निघे ते–न कोणी परी देह जाऊनि घेते.

बऱ्या पुण्यदेहास पुण्यें सजावें,–अधें यातनेच्या शरीरास जावें,
न दोन्हीं: तरी कृष्णरूपीं भरावें–श्रुती बोलती शब्दसंदर्भ रावें.
भुजंगांतुनी मूर्ति जेंव्हां निघाली,–अघज्योति तैं झेंप येऊनि घाली;
तयांतूनि बाहेर जों देव यावा–नभीं दाखवी तेज तो दिव्य यावा.
सवत्सें मुलें जीं मृतें त्यांस देवें,–पहातांचि तीं ऊठती हो! सदैवें.
तयांयुक्त बाहेर जेव्हां निघाला,–हरी मुक्ति दे ज्योतिरूपा अघाला.
स्तवीती नभीं देव कीं देवराया,–अजी! पावलें हीं तुझीं दे वराया."
पडे पुष्पवृष्टी वना नंदनाची,–उभी मूर्ति नंदाचिया नंदनाची.

बाहेर ये अघमुखांतुनि एक वेळे,
लंघी नभा विबुधनाद, समुद्र वेले
वाद्यां मुखांत जय शब्द "नमो नमो जी!"
संतोष तो दशशतानन ही न मोजी.

तो सत्यलोकांत विधातयाला , ये आयकों नाद सुधा तयाला,
निमेष होई इतुक्यांत पाहे, येऊनियां श्रीहरिची कृपा हे.
स्वभक्तरक्षार्थ मुखीं निघाला, जे योगियां ते गति दे अघाला.
" अंतीं मुखा ये गति दे जना मी, " माहात्म्य दावी व्रजराज नामीं

घनतनु दनुजारी वस्त्र ही पीत साजे,
स्तविति सुर विमानीं देखती हो! तसा जे.
झळकति वनमाळा रत्नराजी विराजे.
जलदरुचि पहा तो मोर ते देव राजे.

आजि! अभक्त अघासुरआननीं–हरि शिरे गति दे व्रजकाननीं.
हरि–कथेंत मुखीं जरि तो निघे,–निजसुखींच न कां मिसळूनि घे?

---

## अध्याय चवथा.

जो आहुती वैदिकविप्रसिद्धा,–नेघे मुखीं देव मुखीं प्रसिद्धा,
ते गोपबाळार्पित खाय घांस–श्रीकृष्ण, जो संहरि हो! अघास.

अनुक्रम

भक्ता जसा सुलभ अन्य जनास नाहीं,
सौलभ्य हें न कमळा कमळासनां ही,—
कीं लाभ नाम वदनीं जरि एक थारे, !
आतां पहा ! हरिचि तारक सत्कथा रे !

देऊनियां मुक्ति अघांस देवें,—मुलें सवें घेउनि तीं सदेवें,
सरोवराच्या बरव्या तटातें,—आला हरी नाशुनि संकटातें.
अजित काय मुलांप्रति बोलतो, अजि ! तसाचि धरा वनिं बोल तो.
स्वगडियांस वदे वचनामृता,—करि सजीवहि जेंविं जना मृता.
म्हणे कृष्ण त्या बाळसंतां " पहा रे !—अरे ! या स्थळीं सर्व संताप हारे,
करीं ठाव खेळांचि या संपदा हा,—जया वाळवंटीं घडे संप दाहा.
पहा हे मऊ शीतळ स्वच्छ वाळू—रुचे अन्न एथें क्षुधा तुच्छवाळूं,
पहा साउली दाट केवि द्रुमाची,—नव्या पल्लवीं श्री पहा विद्रुमाची.
स्वपद्मींच पद्मालयाश्री जळाला,—करी देखतां दाह जातो जळाला.
न नीरास हे स्वच्छता मानसाच्या,—गती ज्यांत संताचिया मानसांच्या
झाडें पुण्यफळें करूनि सुफळें केळीं बरीं पोफळें
नारेळें सजळें विचित्र उजळें हीं रम्य सीताफळें,
तैसीं हीं प्रबळें स्वसंचितबळें जीं तुंबळें जांबळें,
पुष्पें हीं विमळें अशोक बकुळें कुंदादिकांचीं कुळें.
पाळीयुक्त तळीं असीं न सुतळीं स्वर्गीं न वा भूतळीं,
वायूतें विमळीं जळीं सकमळीं जीं पाळिती शीतळीं,
अंतर्बाह्य अली महाशतदळीं भृंगावळी सांवळी
बिंदू त्याच दळीं कसा डळमळी घे पैज मुक्ताफळीं ?
वदे कृष्ण गोपाळ बाळा जनातें,—" बसूनी करूं ये स्थळीं भोजनातें,
वनीं वत्स सोडा चरायांसि पाणी,—तयां पाजुनीया " म्हणे चक्रपाणी.
" बरें कृष्णजी बोलसी तूं जसा रे ! तसे वर्ततों, लक्षितों तूज सारे."
असे जेविती सोडुनी वासुरांतें—नभीं होय आश्चर्य सर्वां सुरां तें.
तपांचीं फळें त्या मुलांचीं तशीं कीं—अहो ! सोडिती सर्व निश्चित शिंकीं,
हरीभोंवती मांडितां भोजनातें—वदे व्यास जे पंक्तिशोभा जनातें.

शिंकाच कोणी अशनें करीती,–पत्रावळीं एक अनेकरीती,
कित्येक दुर्वांकुर दर्भ कांहीं–केलीं स्वपात्रें व्रजअर्भकांहीं.
निजमुख कवणाही आड दृष्टी असे ना, रचुनि बसवि ऐशी भोवती बालसेना,
हरि वदन पहाया सर्व दृष्टी भुकेल्या, म्हणुनि बहुत पंक्ती मंडलाकार केल्या.
गळाला असे सर्व देहाभिमान,–स्वसंस्कारशेषें क्वचिद्वर्तमान,
असा चीमणा देह वाटे मनातें–बहू कृष्णसामीप्य त्या वामनातें.
बहु खुजे अति वामन हो गडी,–तनु जशा भवसागरसांगडी,
स्वनिकटत्व तयां बहु देव दे, कवळ दे निजगुह्य तया वदे.
अलंकार मिथ्या गमे हेंचि साच–स्वसंस्कारशेषें दिसे तो तसाच.
असा जो खुजांगी स्वदेहाभिमान–प्रभू बैसवी त्यास साम्यें समान.
प्रारब्धयोगें जरि भोग साच–क्षणैक वाटे तरि तो तसाच
मिथ्या पहाती बहु दूर दृष्टीं–कीं भोग कर्मानुगुणें अदृष्टीं.
अहंकर्तृता आणि तें कर्म साच,–स्वयें मानितो अज्ञ जैसा तसाच,
स्वभोक्तृत्वही भोगही सत्य मानी,–न जाणोनि हें वर्म देहाभिमानी.
अहंकर्तृता भोक्तृतेलागिं दावी,–तरी ज्ञानकाळीं मृषा ते वदावी,
खरें मानिलें कर्म तो भोग वाटे,–जरी चालतो विश्वमिथ्यत्व वाटे.
प्रारब्ध तें निश्चित भोग दुःखी,–भोगी तरी दुःख सुखें वदावीं.
तें नाठवे भोगुनि भोग कांहीं,–बाळांस संतांस शुकादिकांहीं.
यो मला सुखाचि दुःख न यो जी ! वासना जन मनीं असि योजी,
भोग जे स्मरति त्यासचि वाटे,–संत चालति न या जन वाटे.
असे संत हे बाळसंतोष जाणा, गडी श्रीमुरारी स्वयें त्या सुजाणा,
जरी होत दुःखीं सुखी भोगकाळीं–स्मृती त्या न नित्या सुखाच्या सुकाळीं.
क्षुधादिबाधा सरतेचि काळीं–स्वचित्सुखाच्या पडती सुकाळीं.
ते बाळसंतोष जयां सदा हा–संतोष जो तोष दिशांत दाहा.
संतोषतो नंदकुमार साचा–बाळांस तैसा परमारसाचा
पंक्तीस दे लाभ अजी ! वनांत–बुद्धी जयांच्या जगजीवनांत.
हरी देह तो देह बुद्धीस मानी–मृषा स्नेह वैषम्य तत्वीं समानीं,
खुजी तेचि जों जों जयाची वदावी, समीपत्व तों तों तया देव दावी.

एवंच जों जों जडसाच वाटे–तों तों असें दूरिल याच वाटे,
जों जों खुजा हा अभिमान होतो–समीप तों तों हरिही अहो ! तो.
असे कार्णिका अंबुजामाजि जेंवी–मुलां मध्यभागीं बसे कृष्ण जेवी
मुखीं ग्रास सप्रेम घालुनि हातीं–दहीं भात, हे देव लीलां पहाती.

वंशी नादनटी तिला कटितटीं खोवूनि पोटीं पटीं
कक्षे वामपुटीं स्वशृंगनिकटीं वेताटिही गोमटी,
जेवी नीरतटीं तरूतळवटीं, श्रीश्यामदेहीं उटी
दाटी व्योमघटीं सुरां,–सुख लुटी घेती जटी धूर्जटी.

घे हातीं कवळां मनांत कवळा त्या सुंदरा गोवळा
चित्तालागिं वळा, स्वसत्व निराळा, ध्या सांवळा कोवळा;
कीर्तीचा धवळा सुखाब्धिधवळा जो भक्तिचा जांवळा
प्रेमातें खवळा उठे कळवळा त्या प्रीतिनें आंवळा.

हरी कर्णिकेच्या स्थळीं मध्यभागीं–मुलें भोंवतीं–ह्रस्वदीर्घें विभागीं,
लहानापुढें थोर अंभोजपत्रें--असीं बैसवीलीं भवार्कानपत्रें.

वत्स सर्वहि सुभागवतांत श्रीपती स्वाशिशु भागवतांत
जेवितो म्हणति भागवतांत--स्वात्मतारस विभागवतांत.
वर्णरीति यमकीं समजा ते--तेचि कीं विषम कीं सम जाते,
शब्द वामनशुकानुभवाचे--त्रास ते हरिती भानुभवाचे.

जय हिंद

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.
शाखा
मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८७३८